
# माणूस

शनिवार : ६ फेब्रुवारी ७१ चाळीस पैसे

स. न. वि. वि. ११ जानेवारी ७१

'दीपावली'ला पंचवीस वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आपण दि. ६ जानेवारी १९७१ च्या माणूस मध्ये 'दीपावली'बद्दल मजकूर प्रसिद्ध केला त्याबद्दल आभारी आहे.




आठवडाही उलटला नाही,.... 'अखेर ही अशी व्हायची होती'

शनिवार ६ फेब्रुवारी १९७१

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : एकूणसाठावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार....

□ मी कोणत्याही राजकीय पक्षाचा वा संघटनेचा सभासद नाही.

बुधवार दि. ६-१-१९७१ चा अंक वाचला व सामान्य माणसाला हवे ते मिळाल्याचा आनंद झाला, आभारी आहे.

'माझा जाहीरनामा' या सदरातील श्री. पारगावकर, मोकाशी व बाळिंबे यांनी मांडलेली मते पटली. तिघांच्याही मनातून एकच सूर निघतो तो म्हणजे 'राज्यकर्त्या पक्षाला (कॉंग्रेस इंडिकेट) आपले अनमोल मत द्यावे; त्याबद्दल त्यांनी केलेले निःस्वार्थी व निःपक्षपाती स्पष्टीकरण वाचून वाटते, खरोखरच आपले अनमोल मत इतर पक्षाच्या उमेदवाराला देवून वाया घालविण्याऐवजी त्याचे चीज व्हायचे असेल तर ते आपले अनमोल मत सध्याच्या राज्यकर्त्या पक्षालाच द्यावे.

सध्याचा निवडणूक धामधुमीचा काळ आहे. प्रत्येक पक्ष आपल्या परीने आपली बाजू मांडण्याचा व मते लुटण्याचा प्रयत्न करणार आहे, (करताहेत), तसेच वृत्तपत्र व साप्ताहिक चालविणारेसुद्धा आपल्या वृत्तपत्राचा व साप्ताहिकाचा खप जास्त व्हावा यासाठी सामान्य माणसाला सद्य परिस्थितीची योग्य जाणीव करून देण्याऐवजी भलतेच दिशाभूल करणारे अग्रलेख व मजकूर देतील, (देताहेत), तरी आपणास विनंती करण्यात येते की आपण असेच निःपक्षपातीपणे आपल्या 'माणूस' द्विसाप्ताहिकातून सामान्य माणसाला परिस्थितीची योग्य कल्पना देऊन हितावह मार्गदर्शन करावे.

८ जानेवारी, १९७१ — दा. श्री. कदम, ठाणे.

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# नाथ

बबन डिसोझा व मधु पानवलकर हे कै. नाथ पै यांच्या अत्यंत निकटवर्तियांपैकी. त्यांनी सांगितलेल्या नाथ यांच्या काही आठवणी त्यांच्याच शब्दात–

बेळगावहून नाथ विमानतळावर उतरला तेव्हा खूपच थकलेला वाटला. नाथ येथे आला की त्याच्या कार्यक्रमाबाबत मी नेहमी त्याला सांगत असे व तो मधेच त्याविषयी अधिक माहिती विचारी, सूचना करी हा नित्याचाच क्रम पण या वेळी तो बोलण्याच्याही मन:स्थितीत नव्हता. मधुनच तुटकपणे एखादा शब्द बोले. शेवटी घरी गेल्यावर पूर्ण विश्रांती घे आणि मग आपण त्यासंबंधी बोलू असे मी त्याला सांगितले. मुंजबंधूंना झालेल्या अपघातामुळे नाथवर प्रचंड परिणाम झाला होता. थोरले मुंज जीपच्या चाकाजवळ पडलेले पाहण्याचे त्याच्या नशिबी आले होते. भावनाप्रधान नाथवर हा भयंकर आघात होता.

नाथ रविवारी सकाळी पुन्हा बेळगावला जायला निघाला. त्यावेळीही अशाच अवस्थेत होता पण नेहमीप्रमाणे त्याने डॉक्टरांकडून तपासणी करून घेण्यास नकार दिला. कारण डॉक्टर बेळगावला जाण्यास विरोध करतील हे त्याला माहिती होते पण शेवटी विमान तळावर डॉ. तुळपुळे भेटलेच. त्यांनी त्याला तपासून, न जाण्याचा सल्ला दिला. पण नाथने जाण्याचा आग्रहच धरला तेव्हा त्याच विमानाने बेळगावला चाललेले डॉ. जोशी यांना डॉ. तुळपुळे यांनी त्याची काळजी घेण्यास सांगितले. जाण्यापूर्वी काही इंजेक्शनस् द्यावीत असा डॉ. तुळपुळे यानी निर्णय घेतला पण श्रीमती गांधीच्या आगमनामुळे केमिस्टकडे इंजेक्शनस् आणावयाला गेलेली माणसे ' ट्रॅफिक जॅम 'मध्ये अडकून पडली आणि औषधे आली तेव्हा विमानाने उड्डाण केले होते. त्याच्या प्रकृतीची काळजी वाटत होती व हे सर्व ट्रंककॉलवरून बेळगाव येथील डॉ. पाळगींना सांगावे म्हणून सकाळपासून प्रयत्न चालले होते पण त्या दिवशी कोणी फोनच उचलीत नव्हते. शकून अपशकूनावर कधी काळी विश्वास बसू लागतो तो अशा घटना घडून गेल्यावर.

त्याच दिवशीची दुसरी एक घटना. नाथच्या मतदारसंघात लावायची प्रचार-

पत्रके छापून येणार होती पण रात्रीपर्यंत ती न आल्याने आम्ही प्रेसवाल्यावर रागावलो होतो. रात्री त्याचा फोन आला ' बबन प्रचारपत्रके छापण्यासाठी लागणारी लिथो प्लेट मशीनवर चढविली आणि तिचे चार तुकडे झाले, तू रागावशील म्हणून कळविले नाही. दुसरी प्लेट तयार करून पत्रकांची छपाई चालू झाल्यावर तुला फोन करीत आहे. '

समाजवादाची घोषणा करणारा नवकाँग्रेस प्रक्ष एका ' राजा 'ला समाजवादी माणसाविरुद्ध उभे करीत असल्यानेही ते खूपच दुखावले गेले होते व त्यासंबंधी ते विमानतळावर श्रीमती गांधीच्या स्वागतासाठी जमलेल्या काँग्रेसजनांना प्रश्न करीत होते.

देशसंरक्षण, कोकण आणि सीमावाद हे त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे प्रश्न. या प्रश्नासाठी आजारीपणातही त्याने दुर्लक्ष केले नाही की संसदेत या प्रश्नावर होणारी चर्चा प्रकृतीखातर टाळली नाही. यासंबंधीच्या पुढील दोन आठवणी. बेळगाव प्रश्नासंबंधी एक महिन्यात काहीतरी तोडगा काढीन असे प्रधानमंत्र्यांनी आश्वासन दिले होते. नाथ त्यावेळी आजारी होता. श्रीमती गांधी त्याच्या समाचारास गेल्या होत्या. नाथच्या प्रकृतिची चौकशी करण्यापूर्वीच नाथने बाईंना सीमा प्रश्नांबाबत प्रश्न विचारला आणि बाई प्रश्नाला थोडी बगल देत आहेत असे पाहताच नाथने सरळ सुनावले ' जादा नखरा करू नका. बेळगावसंबंधी काय ते बोला. '

गेल्या वर्षीच्या आजारीपणाच्या वेळचीच गोष्ट–संबंधही बेळगाव प्रश्नाशीच. काही बेळगावकरांनी प्रेक्षकांच्या गॅलरीतून पत्रके टाकली व त्याबद्दल त्यांना सभागृहाने काही दिवसाची शिक्षा सुनावली. नाथला तेव्हा संपूर्णपणे बिछान्यात पडून राहण्याचा सल्ला देण्यात आला होता. सभागृहातील एकाही मराठी खासदाराने त्यांच्या सुटकेसंबंधी हालचाल केली नाही. नाथला हे समजताच तो अस्वस्थ झाला व सारखे फोन्स करून इतर खासदार, सभापती व सभागृहाच्या नेत्या श्रीमती गांधी यांना पत्रके फेकणाऱ्यांची भूमिका त्याने समजाऊन दिली. यात त्याने दोन दिवस खर्ची घातले आणि शेवटी शिक्षा कमी होऊन त्या सर्व लोकांची सुटका झाली; ती होईपर्यंत नाथ त्यामागेच होता. सुटका झाल्यावर मात्र ती सर्व मंडळी नाना पाटील यांच्याकडील बाडबिस्तरा घेऊन तडक स्टेशनकडे गेली. आजारी असतानाही त्यांच्या सुटकेसाठी प्रयत्न केलेल्या नाथची विचारपूस करण्याचीही त्यांना गरज वाटली नाही. अर्थातच नाथला खूप वाईट वाटले. त्याचवेळची त्याला थोडी फार लागलेली दुसरी गोष्ट म्हणजे प्रधानमंत्र्यापासून सारे खासदार, विरोधी पक्ष नेते त्याची प्रत्यक्ष भेटून, फोनवरून वा फुले पाठवून विचारपूस करीत. मात्र कॅबिनेट दर्जाचे एक मराठी मंत्री चुकूनसुद्धा त्यांच्या समाचाराला गेले नाहीत.

सभागृहात एखाद्या प्रश्नावर बोलण्यापूर्वी नाथ त्याची कल्पना संबंधीत मंत्र्यांना देऊन त्यासंबंधी तयारीला वेळ देत असे. शत्रुत्वाच्या भावनेने त्याने मंत्री वा इतर खासदारांवर कधी हल्ले केले नाहीत की कोणाचेही चारित्र्यहनन करण्याचाही प्रयत्न केला नाही.

शिकारीची व मासेमारीची नाथला फार आवड. यावेळी प्रकृतीच्या कारणास्तव प्रचार-दौऱ्यात प्रत्येक दोन तीन दिवसानंतर एक दिवस विश्रांती घ्यायची व त्यावेळी या छंदांचा मनसोक्त आस्वाद घ्यायचा असे नाथने ठरविले होते व म्हणून बंदूक व मासेमारीचा गळ आदि सर्व तयारीही केली होती. पण दैवाच्या मनात काही वेगळेच होते. दरवेळी प्रचारदौऱ्यांच्या वेळी चार-आठ दिवस तरी 'बबन तू माझ्याबरोबर राहिलेच पाहिजेस' असा आग्रह करणारा नाथ यावेळी त्यासंबंधी काही बोललाच नाही आणि यावेळी पहिल्या दिवसापासून त्याच्याबरोबर रहायचे ठरविले खरे पण आता सारे काही संपले आहे.

---

१९६८ सालच्या आक्टोबरांत कै. बॅ. नाथ पै हे जिनिव्हा येथे एका परिषदेसाठी गेले होते. तेथून त्यांनी त्यांचे एक सहकारी मित्र डॉ. जी. जी. पारेख यांना जे पत्र पाठविले होते त्यात स्वतःच्या प्रकृतीसंबंधीचाही थोडा उल्लेख होता. त्यापैकी काही भाग–

---

'Its triumph will come only once and finally.'

The day after I came I suddenly developed an unusual giddiness and a doctor had to be summoned. Nothing very serious but I was ordered to be in bed twenty four hours. Really this illness is proving my foul enemy in my life. I defy it, ignore it, show it contempt and never bother about it...And yet there it is, thwarting me, dragging me. It can never defeat me. Its triumph will come only once and finally. But the agony, the sadness, the frustration I feel deep in me for not being able, to work, to do, to fight as I want, as I long and yearn is something few of my colleagues realize. The few occasions death came very close, I felt only a sadness deep and overpowering for all I adored and loved, for that strongest passion of our life-India, for my mother, for my children and Christle. But there never was even a faint shadow

of fear. To defy the perennial challange of death is the only way to live.

At my ear
I always hear,
Time's winged chariot
Drawing near.

But this defiance does not replenish my limited physical resources, it only inducts a pattern of behaviour which accelerates their depletion.

[ डॉ. जी. जी. पारेख व 'जनता'च्या सौजन्याने ]

## कै. नाथ पै यांच्या शोकसभेतील काही निवडक

'त्यांच्यात शीतल चांदणे होते, गुलाबाचा सुगंध त्यांच्याबरोबर दरवळत होता, त्यांच्या ओजस्वी वक्तृत्वामागे होते. मनस्वी मन, कधी मोहक तर कधी दाहक. हे त्यांच्या वक्तृत्वाचे पैलू होते. आज त्यांच्या घरातील हुसेनची चित्रकलाही हुंदके देत असेल शेलीच्या शब्दात सांगायचे तर ते केवळ माणूस नव्हते. ते होते स्वर्गीय चैतन्य.

— वसंत बापट

'ब्रिटीश संसदेप्रमाणे भारतीय संसदेला तसा मोठा इतिहास नाही. पण ज्याप्रमाणे ब्रिटीश संसदेत एडमंड बर्क होता. तसाच भारतीय संसदेतील एडमंड बर्क होता नाथ.'

— दादासाहेब रूपवते

'एकनाथांनी दीनांचे अश्रू पुसले तसेच हेही दीनांचे नाथ होते.'

— चंपा लिमये

'ज्या ठिकाणी त्यांचे शब्द फुलत, सुगंध दरवळे तेथे आज त्यांना श्रद्धांजली वहाण्याचा प्रसंग. संसदेचा त्यांनी जेव्हा निरोप घेतला असेल त्यावेळी संसदगृहाने त्यांना सांगितले असेल. दीड-दोन महिन्याच्या रजेवर जात आहात. मार्चमध्ये परत यालच. विरोधी पक्षांचे ते पंतप्रधान होते. ईश्वराने शब्दांचा राजदूत म्हणूनच त्यांना संसदेत पाठविले होते. त्यांना श्रद्धांजली वहाण्यासाठी त्यांच्यासारखा शब्दप्रभूच येथे पाहिजे. सानेगुरूजींचे दुसरे रूप गेले.'

— प्रमोद नवलकर

□ □ □

# माझा पण जाहीरनामा

यशवंत ग. जोशी

निवडणुकांसंबंधी सामान्य माणसांची प्रतिक्रिया व्यक्त करणारे सदर सुरू करून 'माणूस 'नं जे लोकजागृतीचं कार्य सुरू केलं आहे, त्याबद्दल 'माणूस 'च्या संपादकांचं अभिनंदन.

या सदरात आपलाही जाहीरनामा झळकावा म्हणून खालील प्रपंच केला आहे. प्रथमच एक गोष्ट स्पष्ट करून टाकतो की, मी कुठल्याही राजकीय पक्षाचा नाही. कुठल्याही एका पक्षाकडे माझा विशेष कल आहे असाही भाग नाही, मात्र डोळे उघडे ठेवून व मन स्वच्छ ठेवून प्रत्येक पक्षाकडे मी आजपर्यंत पाहत आलो आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपण संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला. संसदीय लोकशाहीचे मुख्य घटक दोन-एक मतदार व दुसरा संसद सदस्य. मतदार आपले प्रतिनिधी निवडून देतात व त्या प्रतिनिधींनी देशाचा शासन कारभार चालवायचा असतो.

आपला देश विशाल आहे. सुमारे ५३ कोटी लोक त्याच्यात राहतात. त्यांपैकी सुमारे २८ कोटी लोकांना येत्या निवडणुकीत मतदानाचा अधिकार आहे. येत्या निवडणुकीचा आणखी एक विशेष असा की, स्वतंत्र भारतात जन्माला आलेली नवी पिढी या वेळी मतदानास पात्र ठरत आहे.

निवडणुका हा लोकशाहीचा - आत्मा आहे आणि राजकीय पक्ष ही लोकशाही शासन यंत्रणेतील एक अपरिहार्य गरज आहे. ज्या प्रगत देशात लोकशाही यशस्वी झालेली दिसते तिथं राजकीय पक्षांची संख्या मर्यादित आहे. दोन किंवा तीन तुल्यबळ पक्ष तिथं आहेत. त्यामुळं निरंकुश सत्ता एकाच पक्षाच्या हाती दीर्घ काळ न राहता त्याची जागा तितक्याच तोलामालाचा दुसरा राजकीय पक्ष घेऊ शकतो आणि देशाच्या विकासाचा मार्ग अधिक जोमाने आक्रमितो. त्याचप्रमाणे तेथील मतदार हा अधिक सुसंस्कृत व सुशिक्षित आहे. आपलं व पर्यायानं देशाचं हित कुठल्या पक्षाच्या हाती सत्ता देण्यात आहे हे तो समजू शकतो. त्याच्या कानीकपाळी ओरडून ते सांगावं लागत नाही.

आपल्याकडं तशी परिस्थिती नाही. दर निवडणुकांच्या वेळी आपल्याकडं राजकीय पक्षांची संख्या वाढत आहे. १९६७ साली सोळा ते सतरा पक्ष निवडणुकीच्या आखाड्यात उतरले होते. शिवाय आपल्याकडील बहुसंख्य मतदारवर्ग हा निवडणुकीच्या राजकारणाबाबत उदासीन आहे. सन १९६२ मध्ये ५५.४२ टक्के व सन

१९६७ मध्ये ६१·३२ टक्के लोकांनीच मतदान केले. म्हणजे अनुक्रमे ४४·५८ टक्के व ३८·६८ मतदारांनी मतदानाचा हक्क असूनही तो बजावला नाही.

आपल्याकडील सर्वसामान्य माणसाला निवडणुका जवळ आल्या की, जाग येते. नव्हे त्याला उठवलं जातं. जागं केलं जातं. एरव्ही तो उदासीन असतो. आपल्याशीच कुरबुर करीत कसंबसं जीवन कंठीत असतो. त्याला राजकारणाच्या गप्पा हा फुरसदीचा वेळ जाण्याची बिनखर्चाची करमणूक असंच वाटत असतं. माझं हे म्हणणं आकडे देऊन पटविणं कठीण आहे. कारण आज आकडे उपलब्ध नाहीत. परंतु अखिल भारतीय पातळीवरील सर्व राजकीय पक्षांच्या सर्व प्राथमिक सभासदाच्या संख्यांची बेरीज केली तर ती मतदारांच्या संख्येच्या किती टक्के भरेल, याचा क्षणभर विचार करा. अर्थ एवढाच की बहुसंख्य मतदार हा कुठल्याही पक्षाचा प्राथमिक सभासदही नाही. त्यामुळं त्याचा ओढा कुठल्याही एका पक्षाकडे विशेष आहे असं म्हणता येणार नाही. निवडणुकात ज्या पक्षाचा आवाज जोरदार त्याला ही माणसं मत देऊन मोकळी होतात. आपण कुणाला मत दिलं याचा त्यांनाच पत्ता नसतो. समाजहितापेक्षा वैयक्तिक फायद्याकडे त्यांचे लक्ष असते. म्हणून आपल्या देशातील निवडणुका या तात्त्विकदृष्ट्या पाहू जाता खुल्या व शुद्ध आहेत असं म्हणता येणार नाही.

मतदानाबाबत माझं वैयक्तिक मत असं आहे की, आपल्याकडे मतदानाचा हक्क जो वयावर ठेवलेला आहे तो बरोबर नाही. याबाबत किमान शैक्षणिक मर्यादा हवी. सुजाण, सुसंस्कृत माणसालाच मतदानाचा हक्क असावा. आज जो सब घोडे बारा टक्के प्रकार चालला आहे तो बरोबर नाही.

माझी दुसरी मागणी म्हणजे या देशातील राजकीय पक्षांची संख्या कमी व्हायला हवी. भारतातील जवळजवळ सर्व पक्ष पूर्वीच्या काँग्रेसमधूनच, ध्येय धोरणांबाबत मतभेद होऊन, बाहेर पडलेल्या लोकांनी स्थापन केलेले आहेत. हिंदूमहासभा, त्याला पोषक म्हणून निघालेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ—हिंदू महासभेतही सावरकर वादी व विरोधक, आर. एस. एस. मध्येही सावरकराभिमानी व त्याच्या विरुद्ध असे नाना प्रकार. या सर्व हिंदुत्ववादी मंडळींनी शिंगे मोडून आता जनसंघात ठाण मांडले आहे व तेथे धुसफुस सुरू झाली आहे.

समाजवादी त्यांतून प्र. स. प. व सं. स. प. हे दोन गट. त्यातील भेद अद्याप तरी मला उमजलेला नाही. कम्युनिस्टांतही डावे, उजवे, नक्षलवादी इत्यादि प्रकार, रिपब्लिकनमध्ये खोब्रागडे गट, गायकवाड गट, कांबळे गट असे निरनिराळे गट, काल परवापर्यंत एकजुटीचा टेंभा मिरवणारी काँग्रेस. पण तिचीही दोन शकले झाली. म्हणजे आता कोणी कोणास हसायला नको किंवा नावे ठेवायला नको.

पूर्वी जी मंडळी काँग्रेसमधून बाहेर पडली व ज्यांनी नवी चूल मांडली, त्यांनी तरी स्वतःचा पक्ष बळकट केला का ! नाही. उलट बरीचशी शक्ती त्यांनी आपसात भांडण्यातच खर्ची घातली. उरली सुरली होती ती सत्तारूढ काँग्रेसला शिव्या

देण्यात घालवली. सर्वसामान्य माणसाशी संपर्क विधायक कार्यामार्फत ठेवायचा, तोही ठेवला नाही. कारण स्वातंत्र्यानंतर देशातील विधायक कार्य जणू संपलं असं त्यांना वाटले की काय कुणास ठाऊक ? व त्यामुळे विधायक कार्याची मिरासदारी सरकारची, म्हणजे पर्यायाने सत्ताधारी पक्षाची ठरली. त्याचा फायदा त्या पक्षाला मिळाला. म्हणून स्वातंत्र्य मिळून दोन तपे झाली तरी काँग्रेसला तुल्यबळ असा एकाही सशक्त राजकीय पक्ष देशात निर्माण होऊ नये ही त्या त्या पक्षांची दुर्बलता व दिवाळखोरीच सिद्ध करते. विरोधी पक्षांचे दौर्बल्य हीच काँग्रेसची शक्ती ठरली आहे. आजही तोच अनुभव येत आहे. लोकशाहीच्या निकोप वाढीस हे अत्यंत घातक ठरणारे दृष्टचक्र आहे.

पहिल्या तीन सार्वत्रिक निवडणुकीत आपली डाळ शिजत नाही असे पाहून या पक्षांनी आघाड्या स्थापन केल्या. ' काँग्रेस नको, ' ठीक आहे. घ्या मतें. लोकांनी आघाड्यांना मते दिली. आठ नऊ राज्यांतून काँग्रेसला हाकलेले. प्रत्येकजण म्हणाले, ' बरे झाले. ' पण तिची जागा भरून कुणी काढायची ? आघाड्यांनी खुर्च्या पटकावल्या. पण त्यावर स्थिर बसताच येईना. दीड तपाचा अनुभव गाठीशी एकच. यादवी. यादवीचेच सर्व वंशज, त्यामुळे खुर्च्या सरकल्या. तीन वर्षांत मध्यावधी निवडणुका झाल्या. परंतु त्रिशंकूची अवस्था कायम. आघाडीचं एकही राज्य स्थिर नाही. हा इतिहास ताजा आहे.

म्हणून मला असं स्पष्ट वाटतं की, येत्या निवडणुकीत मतदारांवर सर्वांत मोठी जबाबदारी येऊन पडते, ती ही की, त्याने केंद्रात कुठल्याही एका पक्षाचं सरकार येईल याची दक्षता बाळगावी. त्यात दगडापेक्षा वीट मऊ हाच हिशेब गृहीत. त्याचप्रमाणे निवडणुकांच्या रिंगणातून, गॅसवर असलेले व घरघराट लागलेले पक्ष निपटून काढावे. या देशातील राजकीय पक्षांच्या अमर्याद वाढीस आळा घालणे ही आजची अत्यंत महत्त्वाची गरज आहे. उरल्या सुरलेल्या पक्षांनी स्वतःचं विसर्जन करून व्यापक ध्येयधोरणांचे नवे एक, दोन पक्ष काढावे व लोकशाहीस पोषक असा प्रभावी विरोधी पक्ष उभा करावा.

गेल्या दोन तपात ज्या अपायकारक घटना घडल्या, त्याला फक्त काँग्रेसच जबाबदार आहे असे नव्हे तर विरोधी पक्षांचे दौर्बल्य हेही तितकेच जबाबदार आहे. हे पक्ष नादान ठरले, म्हणूनच काँग्रेसला फोफावण्यास अवसर मिळाला व काँग्रेसच्या हातात सर्व सत्ता राहिली. लॉर्ड अॅक्टननं म्हटलंच आहे की, Power corrupts and absolute power corrupts absolntely याचं प्रत्यंतर आपणास पदोपदी येत आहे.

देशात लाचलुचपतीचे प्रमाण बेसुमार वाढलेले आहे. ब्रिटिशांच्या कारकीर्दीत लाचलुचपत सामान्य माणसाला सांपडायची ती मामलेदार कचेरीत. पण आज ग्रामपंचायत, नगरपालिका, रेल्वे, सरकारी दवाखाने व इस्पितळे येथपासून तो

पृष्ठ ५१ वर

## काँग्रेस विजयाचा अंदाज

मध्यावधी निवडणुकांचे पडघम वाजू लागले असून इंडिकेट काँग्रेसचे महाराष्ट्रातील उमेदवार जाहीर झाले आहेत. औरंगाबाद जिल्ह्यातील श्री. बाबुराव काळे व श्री. माणिकराव पालोदकर यांच्या उमेदवारीसंबंधी 'भवती न भवती' होऊन शेवटी जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या रेटयामुळे या दोघांची नावेही पक्की झाली. नांदेडहून लोकसभेसाठी विसर्जित लोकसभेचे सदस्य श्री. व्यंकटराव तरोडेकर यांचेच नाव निश्चित झाले. बीडहून श्री. सयाजीराव पंडित, उस्मानाबादहून श्री. तुळशी-राम पाटील, परभणीहून श्री. शिवाजीराव पाटील यांची नावे इंडिकेटतर्फे जाहीर झाली आहेत. मराठवाडा विभाग काँग्रेसचा बालेकिल्ला आहे. मागील वेळेस बीडचा अपवाद वगळता सर्व काँग्रेसचेच उमेदवार निवडून आले होते. उत्तर प्रदेशच्या 'संविद'चे मुख्यमंत्री श्री. त्रिभुवन नारायण सिंग यांचा नवकाँग्रेसचे श्री. द्विवेदी यांनी सुमारे १७ हजार मतांनी पराभव केल्याने सर्वत्र राजकीय क्षेत्रात नवे वारे वाहू लागलें आहे. मराठवाड्यातही या घटनेचे नवकाँग्रेसच्या गोटाने स्वागत केलेआहे.

मराठवाड्यांत जनसंघ, संसोपा व शे. का. पक्षाचे काम त्या मानाने बरे आहे. लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुकीसाठी त्यापैकी काही पक्षांनी आपली नावे जाहीर केली आहेत. औरंगाबाद जिल्ह्यात नवकाँग्रेसला संसोपाशी मुकाबला करायचा आहे. काँग्रेसची तयारी चांगली आहे. औरंगाबादचे तडफदार काँग्रेस कार्यकर्ते श्री. बाळासाहेब पवार यांनी कार्यकर्त्यात उत्साह निर्माण केला आहे. संसोपाचे तरुण आमदार श्री. बापूसाहेब काळदाते यांनी जरी निवडणूक लढविली तरी त्यांनाही काँग्रेस निश्चितपणे पराभूत करील अशी आव्हानवजा भाषा श्री. पवार यांनी वापरली आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील काँग्रेसच्या दोन्ही उमेदवारांमागे कार्यकर्त्यांचा चांगला संच आहे. ग्रामीण भागातील जनमताच्या 'स्टीम रोलर'पुढे विरोधक तग धरू शकणार नाहीत असे वाटते. नांदेडचे नवकाँग्रेसचे उमेदवार श्री. व्यंकट-राव तरोडेकर यांची प्रचार-तयारी जोरात सुरू आहे. मुख्यमंत्री ना. नाईक त्यासाठी ७ फेब्रुवारीस नांदेडला येत आहेत. इंदिरा गांधीही बहुधा येतील. विरोधी पक्षांतर्फे जनसंघाचे श्री. लक्ष्मणराव गंजेवार उभे आहेत. श्री. गणपतराव वाघमारे, श्री. वहिदोद्दिन, श्री. नेरलीकर तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चिरंजीव श्री. भैयासाहेब, तसेच श्री. भाऊसाहेब मोरे हे उभे राहणार असल्याचे सबंधित गोटातून सांगण्यात येत आहे. नांदेडच्या लोकसभा मतदार संघात पुढील सहा मतदार संघ असून एकूण मतदार ५ लाख ८८ हजार २८० आहेत.

| मतदार संघ | मतदार |
|---|---|
| १. नांदेड | ९७३५५ |
| २. किनवट | ९४८३५ |
| ३. हदगाव | ९८२५२ |
| ४. भोकर | ८८०७० |
| ५. बिलोली | १,०१,६४५ |
| ६. कंधार | १,०८,११५ |

लोकसभेच्या मागील निवडणुकीत श्री. तरोडेकर यांना सुमारे १ लाख ३५ हजार मते मिळाली. रिपब्लिकन पक्षाचे श्री. आठवले यांना ९९ हजार, जनसंघाचे श्री. गंजेवार यांना १७ हजार व श्री. गणपतराव वाघमारे यांना २५ हजार मते मिळाली. जनसंघाचा वाढता प्रभाव, रिपब्लिकन पक्षाची मते, नवकाँग्रेसची अधिक उजळ होत असलेली जनमानसातील प्रतीमा इत्यादी घटक लक्षात घेता श्री. तरोडेकर निवडून येतील असे दिसते. परभणीहून श्री. शिवाजीराव देशमुख व शे. का. प. चे श्री. गव्हाणे यांची लढत रंगेल. मागील वेळेस बीडची सीट काँग्रेसला गमवावी लागली. या वेळचे उमेदवार 'बहुजन समाजातील' आहेत त्यामुळे तीही जागा कदाचित काँग्रेस जिंकेल. उदगीरच्या राखीव मतदार संघातील श्री. कांबळे व श्री. शृंगारे यांची लढतही रंगतदार होणार. निवडणूक जवळ आली आहे. प्रचाराचा धुरळा उडत आहे. उलटसुलट अंदाज व्यक्त होत आहेत पण निकालानंतर काँग्रेसच मराठवाड्यात विजयी होईल हा माझा अंदाज खरा झालेला दिसेल असा माझा अंदाज आहे !

## स्नेहसंमेलनांची गर्दी

जानेवारी महिना म्हणजे कॉलेजांच्या स्नेहसंमेलनांच्या भाऊगर्दीचा काळ. चांगला प्रमुख पाहुणा मिळविणे हीही अवघड गोष्ट होत आहे. मंत्री प्रमुख पाहुणे म्हणून मिळत नसल्यास 'विचारवंत' 'शिक्षण तज्ज्ञ', 'लोकप्रिय विरोधी नेते' वगैरे वगैरे स्नेहसंमेलनास आणण्याचे 'श्रेय' मिळते.

लातूरच्या बसवेश्वर कॉलेजने डॉ. अप्पासाहेब पवार यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित केले होते. 'विद्यार्थ्यांनी' सोपे विषय घेऊन परीक्षेला बसण्याऐवजी गणित, पदार्थविज्ञान यासारखे विषय घ्यावेत व इंग्रजीचाही अभ्यास करावा. ज्ञानाच्या कक्षा विस्तारत असल्याने रशियन, चिनी, जर्मन, फ्रेंच या भाषांचाही आपणास कालौघात अभ्यास करावा लागेल असे सांगून कुलगुरू डॉ. पवार यांनी आपल्या भाषणात पुढे सांगितले, विद्यार्थीजगात अनेक घडामोडी घडत आहेत. विद्यार्थ्यांच्या दोषासंबंधी केवळ त्यांनाच जबाबदार न धरता त्यांची जबाबदारी समाजाच्या इतर घटकांवरही टाकली पाहिजे. विद्यार्थ्यात थोडाफार थिल्लरपणा आला आहे.

ज्ञानाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांचे वाचन सुटलें आहे. ते सातत्याने वाढविले पाहिजे.

अमेरिकेमध्ये 'काळ्या-गोऱ्यांवरून' विद्यार्थ्यांत असंतोष आहे. इंग्लंडच्या लोकसभेने विद्यार्थी विश्वातील असंतोषासंबंधी अहवाल सादर केला आहे, फ्रान्समध्ये विद्यार्थी नवनिर्मितीसाठी झगडत आहे, त्यासंबंधीही डॉ. पवारांनी विवेचन केले.

## यशवंत कॉलेजचे संमेलन

नांदेडच्या यशवंत कॉलेजने स्नेहसंमेलनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मजूर मंत्री ना. नरेंद्र तिडके यांना निमंत्रित केलें होते. श्री. तिडके यांनी Grand Reduction Sale या नाटकाचा, तसेच श्री. वामन चोरघडेलिखित 'शाप' कथेचा उल्लेख करून जीवनातील हरवलेल्या व घसरत चाललेल्या मूल्यांचे विश्लेषण केले. मानव आणि चंद्र यांतील अंतर शास्त्रीय शोधाने कमी होत चालले आहे पण माणसा-माणसातील अंतर मात्र वाढत चालले आहे. ते कमी करण्याची आज खरी गरज आहे असे त्यांनी आग्रहपूर्वक प्रतिपादन केले.

स्नेहसंमेलनानिमित्त 'शेलापागोटे' (फिशपाँड), विविध मनोरंजनाचे व इतर कार्यक्रम झाले. 'सबै भूमि गोपालकी', 'बिन माणसाचा हात' ही दोन मराठी, 'रेडिमेड पति' हे हिंदी व 'विद्यार्थी' हे उर्दू नाटक या निमित्ताने झाले. सबै नाटकात सबै भूमि गोपालकी नाटकास श्रोत्यांनी उत्तम प्रतिसाद दिला. 'भूमि बळकाव' आंदोलनाचा उपहास या नाटकात आहे. मोठ्या जमीनदाराच्या जमिनी-वर 'सत्याग्रह' करण्याचे 'धाडस' होत नसल्यानें सावकारांकडे शेती गहाण टाकलेल्या गरीब शेतकऱ्याला पैसे देऊन त्याच्या जमिनीवर 'सत्याग्रह' करण्याची 'परवानगी' काढण्यात येते, अशा स्वरूपाचे नाटकाचे कथानक असून सर्वच पात्रांनी आपआपली कामे अत्यंत कौशल्याने व चोख केली आहेत. उत्तम अभिनया-बद्दल कॉमर्स शाखेच्या विद्यार्थ्यांचे सर्वांनी कौतुक केले.

## मुस्लिम तरुणांतील बेकारी

औरंगाबाद येथील जिन्सी शहाबाजार विभागातील ५०० कुटुंबांची पाहणी करण्याचे काम युवक सहजीवन संघटना आणि सरस्वती भुवन कॉलेजातील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे करण्यात आले. यासंबंधी 'मराठवाडा' दैनिकात एक लेख आला असून मुस्लिम समाजातील युवक वर्गात किती वाढती बेकारी आढळते यासंबंधी माहिती देण्यात आली आहे. २५० बेकार युवकात १९० मुस्लिम व ६० हिंदू-बौद्ध वर्गातील आहेत. बेकारीप्रमाणेच तुटपुंज्या मिळकतीमध्ये अवाढव्य कुटुंबे पोसण्याचे अवघड कार्यही मुस्लिम समाजाला करावे लागत आहे. १८ माणसांच्या कुटुंबांचे भरण-पोषण १०० रुपये या मिळकतीत कसे करावे हा प्रश्न अर्थशास्त्रज्ञांनी

स्वतःलाच विचारून पहावा. मुस्लिम समाजाला संख्येच्या प्रमाणात नोकऱ्या मिळत नाहीत, अशीही टीका करण्यात आली आहे. शिक्षणाकडे द्यावे तसे लक्ष हा समाज देत नाही. मुल्ला-मौलवींच्या व रूढिवाद्यांच्या प्रभावाखाली मुस्लिम समाज असल्याने आधुनिक शिक्षणापासून तो वंचित आहे हे या बेकारीचे एक कारण आहे. लोकसंख्येच्या तुलनेत ख्रिस्ती २ टक्के आहेत पण केंद्रीय नोकऱ्यात त्यांचे प्रमाण ५ टक्के आहे. मुस्लिम लोकसंख्या दहा टक्के असून नोकऱ्यातील प्रमाण फक्त ५ टक्के आहे.

सत्ताधारी कॉंग्रेसप्रमाणेच विरोधी पक्षही मुस्लिमांच्या विकासाबाबत उपेक्षा वृत्तीनेच पाहतात. प्रत्येक पक्षाला मुस्लिमांची एक गठ्ठा मते कशी मिळतील याचीच चिंता असते. खऱ्या आर्थिक विकासासाठी कोणीच प्रयत्न करीत नाही. त्यामुळेच १९६९ डिसेंबरमध्ये अल्पसंख्याकांबाबत अ. भा. कॉंग्रेसपुढे ठेवण्यात आलेल्या अहवालात जे म्हटले आहे, "There seems to have been a systematic attempt to keep out of the services, both in the government and the private sector and opportunity for entering the trade and industry are far from satisfactory" ते केवळ मानभावीपणाचेच वाटते. मुस्लिम समाज एकप्रकारे सुशिक्षित, आधुनिक होऊ नये व अंधपणाने आपल्याच पदरात त्याची एक गठ्ठा मते पडावीत अशीच (सुप्त) इच्छा सर्व राजकीय पक्षांची असावी असे मला यासंबंधी विचार करताना वाटते !

## नांदेडचा भव्य प्रकल्प

नांदेड शहरालगत धनेगावजवळ एक भव्य प्रकल्प उभारला जात असून मुंबई शहरानंतर अशा स्वरूपाचा प्रकल्प नांदेड येथेच होत आहे. मराठवाडा विकास महामंडळांतर्गत असलेल्या टेक्स्टाईल कॉर्पोरेशन संस्थेमार्फत उभारले जात असलेले पॉवरलूम युनिट हे 'गतिमान' झाले आहे. टेक्स्टाईल कॉर्पोरेशनचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. व्यंकटेश राम, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर श्री. जयंतराव देशपांडे व इतर अधिकाऱ्यांनी नांदेडच्या पत्रकारांना प्रकल्पाची माहिती दिली. सदर प्रकल्पाची माहिती एखाद्या लेखरूपानेच करून द्यायला हवी. या संदर्भात तूर्त एवढेच म्हणता येईल की, हा प्रकल्प महत्त्वाकांक्षी असून नांदेडच्या व मराठवाड्याच्या औद्योगिक विकासाला चालना देणारा आहे.

सामान्यतः अशा संस्थांतून 'कारभारी' अधिक व काम कमी असा 'लोकशाही' खाक्या दिसतो. हा प्रकल्प या नियमाला कौतुकास्पद अपवाद असून 'मूठभर' अधिकारी वर्गाने अल्पावधीत घडवून आणलेली प्रगति कौतुकास्पद आहे. पुढील वार्तापत्रात सदर प्रकल्पाची माहिती देईन. कारण मराठवाड्यांतच नव्हे तर महाराष्ट्रात अशा स्वरूपाचा प्रकल्प क्वचितच आढळेल. □ □ □

## आठवण

# ही अशी व्हायची होती

**रवींद्र पिंगे**

दलाल एक झपाटलेले कलावंत होते. हातातला ब्रश म्हणून कसा तो त्यांनी कधी सुटू दिला नाही, की रंगाची पेटी कधी बंद केली नाही. ते सतत कागद रंगवीत राहिले आणि रंगवता रंगवता एकीकडे हसत राहिले. तसा दलाल मोठा हसतमुख माणूस होता. साहजिकच माणसं त्यांच्या भोवती–भोवती असत. ते चिडत. भडकत. प्रसंगी टाकूनही बोलत. कधीकधी शिवीगाळीपर्यंत प्रसंग भिडे. एकदा तर हाणायसाठी पेपरवेटसुद्धा उचलला होता ! पण हा सारा क्षोभ क्षणैक असे. त्यांचा पारा जसा जोरात चढे, तसा तत्काळ उतरेसुद्धा. विशेषतः कुणी हलगर्जीपणा केला की ते गरम होत. कुणी बनवाबनवी केलेली त्यांना अजिबात खपत नसे. प्रसंगी ते कानशिलं लाल करून घेत. मी बाजूला असलो की सांगे, “ दलाल, असे तापू नका. त्याचा परिणाम तुमच्याच तब्येतीवर होईल.” त्यांना पटे. टेबलाचा खण उघडून ते औषधाची गोळी काढीत, तोंडात टाकीत, वर घोटभर पाणी पीत. मग पाण्यासारखे थंड होत. मूळ विषयाशी सांधा सांधीत. चेष्टामस्करी सुरू होई. हसण्याला ऊत येई. वेलीवर फूल डुलावं तसं त्यांच्या सावळ्या चेहऱ्यावर हसू उमलू लागे. हसण्यात त्यांचा हात धरणारा कुणी नव्हता. पूर्वी अण्णा माडगूळकर, पु. ल. देशपांडे, मं. वि. राज्याध्यक्ष, बाळ सामंत वगैरे संभाषणपटू दलाल स्टुडिओचं वातावरण खदखदत ठेवायचे. ती बैठक पांगली. दलालांनीही पन्नाशी ओलांडली. आयुष्याबद्दल ते थोडे अधिक सावध झाले. स्वतः डावपेच खेळले नाहीत. दुसऱ्याचे डावपेच मात्र नीट ओळखू लागले. थोडेसे गंभीरही झाले. पण मुळातली हसण्याखिदळण्याची हौस कुठे जाते ? दरम्यान, गोपाळकृष्ण भोबेंचं उत्साही पर्व सुरू झालं. तेही मावळलं. तो भर पंक्तीतून सर्वांना चकवून पळाला. दलाल खचले.

नियतीच्या चाळ्यांसमोर हतबुद्ध झाले. दलालांचा स्टुडिओ तसा काळोखीच आहे. आता काळोख थोडा अधिक गडद झाला. त्या घनकाळोखातच मी तिथे एका सायंकाळी प्रवेश केला. पूर्वी येत-जात होतोच. पण आमचं मेतकूट असं नव्हतं. मी लिहावं, त्यांनी छापावं, असा सिधा मामला होता. भोबे गेल्यानंतर माझी बैठक सुरू झाली, वळण सुरू झालं. येता येता मी बारा बावडयांचं पाणी पिऊन आलो होतो. एक चहाफराळाचं कॅन्टीन चालवून झालं होतं. नाटक कंपन्यांचा सत्संग लाभलेला होता. सतत सोळा वर्षं मिनिस्टरांना मुजरे करून करून पाठीत वाकलो होतो. वाकल्या पाठीवर भयानक विनोदी किस्स्यांचे गोण होते. ते मी दलालांच्या स्टुडिओत नीट उतरवून ठेवले. प्रत्येक भेटीत, म्हणजे जवळजवळ एक दिवसाआड आम्ही त्यातले नग हाताळीत होतो. पोटभर हसत होतो. एव्हाना मी स्वतःला आकाशवाणीवर चिकटवून घेतलं होतं. त्यामुळे घोळ वाढतच गेला. पूर्वी केनेडी पुलावरल्या त्या काळोखी स्टुडिओत हसत होतो. आता रस्त्यावर चालतां चालता उभे राहून हसत होतो. दलालांची ती एक खास पद्धत होती. ते चालता चालता हात धरून थांबवीत. मग अंग घुसळून किस्सा सुनवत. हसून झालं की मग पुढचं पाऊल. पाच दहा पावलं गेली कीं पुन्हा हात पकडणं. नवा किस्सा. खदखदून हसणं. मग नरम टाळी. ती दिली की आगेकूच. हे नाना चौकापर्यंत चालायचं. ह्या फर्लांगभर अंतराला आम्हाला अर्धा घंटा लागे. नाक्यावरल्या सोमण बिल्डिंगातून लीलावती भागवत आमची दुक्कल पाहत. दुसऱ्या दिवशी विचारीत, 'तुम्ही एवढे तल्लीन होऊन काय हो बोलत असता ?' काय सांगणार ? आमच्या गप्पात शंभर विषय निघत. त्रिदादमास्तरांची चित्रं, बेंद्रे आर्टिस्टांची नवी शैली, केतकरमास्तरांचा क्लास, व्यंकटेश माडगूळकरांचं प्रभावी नाटयवाचन, शामराव ओकांची कलंदरी, अत्र्यांची अखेर, रॉय किणीकरांचं फटींगपण, शांतारामबापूंची घमेंड, फणसा – अननसाची गोवेकरी भाजी, गब्रू लेखकांची हरामखोरी, जुनी मुंबई, सिनेमावाल्यांचं लफंगेपण, भोब्यांचं भोळेपण. असे शंभर विषय निघत. नाना चौकात आम्ही भेळपुरी चापायचो. मी मनसोक्त हात मारी. ते फक्त एक प्लेट खात. अगदी चवीने खात. शेवटचे पाचसहा महिने तर ते बहुशः एकभुक्तच असत. त्यांना पोटात बरं नसे, म्हणून गोळ्या खात. रात्री जेवत. खरं तर गप्पाटप्पांनीच त्यांचं पोट भरे. हास्यगुटिका त्यांना विलक्षण मानवत होती. हातचं राखून परीटघडीचं हसणं दलालांना कधीही जमलं नाही. मनमोकळेपणाने ते खळखळून हसायचे. हसण्याचा किल्ला त्यांनी नीट सांभाळला होता.

बरं, दलालांना हसण्याला कसलंही कारण पुरत असे. विजय तेंडुलकरांचा 'प्रचंड' हा अत्र्यांवरचा लेख वाचताना हसून हसून ते बेजार झाले होते. आल्यागेलेल्या प्रत्येकाला त्यातले प्रसंग ते पुन्हा पुन्हा हातवारे करून सांगत होते. गोवा असोसिएशनच्या नव्या नाटकाला ठोकू नका अशी विनंती करायला ते एकदा अत्र्यांकडे गेले. दलाल असोसिएशनचे पदाधिकारी होते आणि त्र्यस्थाच्या गोफण-

बाजीने संस्थेचे प्राण कासावीस होऊ नयेत अशी त्यांची फार इच्छा होती. अत्र्यांनी दलालांचं स्वागत केलं, आपलं ग्रंथभांडार दाखवलं. म्हणाले, 'आहे का कुणी मराठी लेखक की जो असं माझ्यासारखं अफाट वाचन करतो ? असं तुडंब वाचलं पाहिजे. वाचलं नाही तर सुचणार कसं ? तुमचे हे नवे नाटककार म्हणे तीन तीन दिवसात नाटकं लिहितात ! हो नं ? मग जोड्यांनी मारा त्यांना ! अरे, तीन तीन वर्षं घालवावी लागतात, तेव्हा कुठे एक नाटक जमतं. आमच्याकडे पाहा ना. आम्ही असं वाचतो तेव्हा लिहितो ! वाचतो नि लिहितो. जा तुम्ही. आपण तुमच्या नाटकाविषयी एक शब्दही लिहिणार नाही. जा !' हा सगळा प्रसंग दलाल हसत हसत साभिनय सांगत. एका मंत्रिणीने 'बाबुराव' नावाचं कुत्रं पाळलं होतं. 'काय ? आमच्या बाबुरावांची आंघोळ झाली का ?' असं तिने विचारून माझी काय त्रेधातिरपीट उडवली, हे मी दलालांना सांगितलं. पुढे दलाल तोच किस्सा मला सुनवीत ! हसत हसत आल्या-गेल्यालाही सुनवीत ! एकदा मला म्हणाले, तुमचा छोटासा परिचय लिहून मला द्या. मी लिहून दिला. त्याच्या तळाला थोडासा आगाऊपणा करून लिहिलं,

'माझ्या आवडत्या गोष्टी–चि. सांबप्रसाद, फणसाची भाजी, विंगमध्ये उभं राहून नाटक पहाणं, कुमार गंधर्व, बियर, मंगेशी, काका गाडगीळांचं ललित लेखन आणि राज कपूर.

नावडत्या गोष्टी–हौशी नटनटी, माठाची भाजी आणि दिलीपकुमार.'

ही सर्व चेष्टा होती. पण दलालांनी तो कागद जपून ठेवला. सर्वांना हसत हसत दाखवला. दलाल तसे निर्व्यसनी होते. म्हणजे खातपीत नव्हते असं नाही. कठोर प्यूरीटन मात्र नव्हते. चार मित्रमंडळी जमली की थोडी मौजमजा करीत. पण तेवढ्यापुरतीच. त्यात जीव अडकवून घेत नसत. कामाचा ताण पडू लागला तसं त्यांना वाटू लागलं की आपल्याला एखादं व्यसन असावं. म्हणजे विश्रब्ध पडून वेळ आरामात घालवता येईल. आपली ही शुभकामना त्यांनी चार कानी केली. कमिटी बसली. दलालांच्या तब्बेतीला पाईप ओढणं मानवेल ह्या निष्कर्षावर आली. दलालांना मूठभर मांस चढलं. ते सदूभाऊ जोगळेकर वगैरे मित्रमंडळींसह वाजतगाजत फौन्टनला गेले. तिथे भारीतले भारी पाईप्स घेतले. उत्तम तंबाखू घेतला. घेतलेल्यातले दोन पाईप्स तिथल्या तिथे मित्रांना दिले. उरलेले घेऊन मिरवीत मिरवीत घरी आले. आज ओढू, उद्या ओढू, परवा सुरवात करू, असे संकल्प सुटले. पाइप्स पडूनच राहिले. दरम्यानच्या काळात जवळच्या नात्यात एक अपमृत्यू झाला. दलाल सुन्न झाले. म्हणाले, व्यसन आपल्यासाठी नाही. आपल्याला मानवणारं नाही. लाभणारंही नाही. त्या पाइपांना त्यांनी पुढे स्पर्शही केला नाही. मारे व्यसन करायला गेले. पण होते तिथेच निर्व्यसनी राहिले. खाद्यपेयांची तलफ म्हणून म्हणतात ती त्यांना कधीच आली नाही. अर्थात, चाटलं नि बाटलं असं

बोंबटण्याइतकं त्यांचं मन उथळही नव्हतं. ही सर्व हकीकत दलाल मोठ्या मिस्कीलपणाने सांगत. आपल्या निर्व्यसनीपणाची टिमकी वाजवण्यासाठी नाही. त्यातून विनोदनिष्पत्ती होते म्हणून! मात्र, स्वस्थपणे बसून आपल्याला विश्रांती घेता येत नाही ह्याची त्यांना फार खंत होती. म्हणायचे, 'लोक कसा बुवा आराम करतात कळत नाही. मला नुसतं निवांतपणे असं पाच मिनिटंसुद्धा बसता येत नाही. मला सतत काही ना काही करीत राहावं लागतं, वाचावं लागतं.' पाहावं तेव्हा दलाल कामात गढलेले असत. वेगवेगळ्या शैलीतली हजारो चित्रं त्यांनी राक्षसी झपाट्यानं हातावेगळी केली. दोन्ही प्रकारची कामं केली. पोटार्थी आणि उमाळ्याची. अर्थात पोटार्थी कामाचा पर्वत झाला आणि उमाळ्याच्या कामाचा केवळ झुळझुळता ओहोळ राहिला. पुस्तकांची तिरंगी वेष्टनं हे प्रमुख पोटार्थी काम. त्यात ते हमेशा गळ्यापर्यंत बुडालेले असत. गोवे सोडताना त्यांनी खूणगाठ मारली होती. समृद्धी दारात वळती करीन नि मगच गोव्यात परतेन. पंचवीस वर्षं कष्ट उपसून उत्तम व्यवहारे त्यांनी धन जोडलं आणि नंतर तिगस्ता ताठ मानेने गोव्याला गेले. दरम्यानच्या काळात मन चाहेल तशी विश्रांती घेता यावी आणि चित्रं चितारता यावीत म्हणून त्यांनी पुण्याला हौसेने बंगला बांधला. तो एक व्यापच झाला तेव्हा वैतागले. मनात आलं विकून मोकळे झाले. दलालांचं हेसुद्धा एक वैशिष्टचच होतं. जागृत असूनसुद्धा ते मित्रांच्या आग्रही शब्दाला बळी पडत. पैसे ओतत. मग फरफट सुरू होई. टेकीला येत. पुरते वैतागत. नि एकटेच फोफाट्या-तून बाहेर पडत. तोपर्यंत ओठ पोळलेले असत. असं अनेक वेळा झालं. सिनेमा अंगाशी आला. बंगला अंगाशी आला. विश्वास टाकलेल्या माणसांनी टांगा मारल्या. तशात साठीचा उंबरठा दिसू लागला. 'काळाची वाळू पायाखालून झरझर सरू लागली. मनासारखं करायचं काम मागे उरलं. मुंबईतच स्वतंत्र स्टुडिओ बांधावा त्याला जोडूनच राहण्याचा गाळा असावा, असं त्यांना वाटू लागलं. त्याप्रमाणे प्रभादेवीला सागराच्या बाजूला बांधकामाची त्यांनी व्यवस्थाही केली. म्हणाले, 'पश्चिमेला मोठ्या खिडक्या करून घेतल्याहेत. हवा तेवढा उजेड येईल. भराभर चित्रं काढेन. आता आयुष्यात थोडा निवांतपणा येईल.' पण निवांतपणे स्वस्थ बसणं दलालांच्या कुंडलीतच नव्हतं. दिवा ओढून घेऊन त्याच्या लख्ख प्रकाशात ते सदान् कदा कुंचल्याचे फटकारे मारीत बसलेले असत. वाचन घरी करीत. 'दीपावली'कडे येणारं सर्व साहित्य पहाटे वाचीत. त्यावर स्वतः निर्णय घेत. मी-मी म्हणाऱ्यांचं साहित्य नावडल्यास बेशक परत करीत. पण काही काही जबरदस्त लेखक दलालांची भंले जिरवीत. पाटणकर किंवा अशाच काहीतरी नावाचा आमचा एक लेखक स्नेही, लग्नमुंजीतले आचारी जिलब्याची चाकं पटापट पाकात सोडतात, तशा गोष्टी लिही आणि संपादकांच्यापुढे ठेवी. त्याच्या अट्टाहासापुढे मी हात टेकले. माझ्यावरचं वादळ दुसरीकडे वाहवत जावं म्हणून मी दलालांचं नाव

त्याच्यापुढे केलं. दलालांनाही आगामी संकटाची सूचना दिली. ते म्हणाले, 'अरे, आपण त्याला पळवून लावू!' तो पाटणकर की कोणसा, एका सुप्रभाती दलालांच्या समोर प्रकटला. म्हणाला, 'तो फलाणा फलाणा संपादक माझी गोष्ट शंभर रुपयाला एक ह्या भावाने स्वीकारतो नि दिवाळी अंकात छापतो. ही गोष्ट तुम्ही घ्या.' दलाल शांत स्वरात म्हणाले, 'तो प्रश्नच निर्माण होत नाही, कारण तुमचा दर आम्हाला परवडत नाही आणि पुढे केव्हा परवडणार नाही.' दलालांना वाटलं आपण जिंकली. तो लेखक दलालांच्या बारशाच्या घुगऱ्या खाल्लेला होता. तो म्हणाला, 'तुम्ही किती देऊ शकाल?' 'फक्त पाच रुपये!' त्याला अखेरच्या वाटाण्याच्या अक्षता लावण्याच्या हेतूने दलाल म्हणाले. त्यावर तो कथेकरीबुवा शांतपणे म्हणाला, 'मला चालतील! आता छापा ही गोष्ट.' दलाल चारी मुंडे चीत झाले. हा सगळा किस्सा त्यांनी आमच्या पुढ्यात दहा वेळा उगाळला असेल! आणि तोही हंसत-हंसत. टाळ्या मागीत-मागीत.

दलालांनी अतोनात कष्ट उपसले आणि हसून खेळून ते हलके केले. तीस वर्षांपूर्वी ते सडे होते तेव्हापासून ते जॉली सर्कलमध्ये फिरू लागले. बॉम्बे बुक डेपोसमोरच्या माधव निवासाच्या माडीवर ठार बहिरे झालेले आण्णासाहेब कुळकर्णी, रामचंद्र यशवंत किणीकर, बाळ कुडतरकर आणि दलाल, असा अड्डा पडलेला असे. पुढ्यातल्या फरसाणावर ताव मारीत मारीत पैशांचा पर्वत उभा करण्याच्या किणीकरांच्या योजना ऐकणे हा त्यांचा एकमेव उद्योग असे. दलाल त्या वेळी बी. पी. सामंत कंपनीत चाकरमाने होते. ते सिनेमाची पोस्टर्स करीत. त्यांनी तयार केलेल्या पोस्टर्सचा एक सिनेमा तुफान चालला. वितरकाने दलालांना रोख पारितोषिक जाहीर केलं. नाव पुकारलं दलाल. जागचे हलले नाहीत. त्यांनी ते द्रव्य स्वीकारलं नाही. वेळ आली तेव्हा चोख सांगितलं, 'मी एकटा पारितोषिक स्वीकारू शकत नाही. पोस्टर्सला सर्वांचे हात लागलेले आहेत. तुम्ही रक्कम आमच्या कंपनीकडे पाठवा. आम्ही सगळेजण ती वाटून घेऊ.' एकदा एका निर्मात्याने चित्रपट यशस्वी झाला म्हणून श्रमभोजन घातलं. पोस्टर्स दलालांच्या हातचे होते. साहजिकच त्यांना आमंत्रण गेलं. दलाल आले. पाहातात तो त्यांची जागा दूर कोपऱ्यात ठेवलेली. दलाल बधले नाहीत. म्हणाले, 'एक आमंत्रित कलावंत म्हणून मी आलो आहे. गरजूसारखा दूर नाही बसणार. जिथे यजमान किंवा त्यांचे सन्मान्य मित्र बसतील तिथेच माझं पान असलं पाहिजे.' निर्माता नरमला. त्या दोघांची पंगत एकाच मेजावर झाली. दलाल असे ताठ का वागले? किंवा, वागू शकले? कारण, त्यांची विद्या त्यांच्या हाती सलामत होती. विद्या अभय देते.

कलावंताचं काळीज लाभलेल्या दलालांची अभिरुची घरंदाज होती. सदुभाऊ जोगळेकर, गणेशराव तांबे, अच्युत बर्वे आणि स्वतः दलाल, हा जिगर दोस्तांचा

मूळ चौथरा. ह्या चौथऱ्याभोवती वेगवेगळ्या परिघात मित्रांचे वाफे फुललेले होते. पु. भा. भावे, अरविंद गोखले, आनंद साधले, गोपाळकृष्ण भोबे, जयवंत दळवी, हा असाच हाताजवळचा घमघमीत ताटवा. प्र. श्री. नेरूरकर, श्रीराम कामत, प्रभाकर अत्रे, अशोक परांजपे, अरविंद ताटके हे हुकामी लेखक, हा आणखी एक वेगळा ताफा. जितेंद्र अभिषेकी, रामकृष्ण नाईक, वसंत गुडे, मणेरकर हा आणखी एक मांडव. स्नेहपुष्पाच्या पाकळ्या ह्या अशा विखुरलेल्या होत्या. पण ह्यातल्या कुणाच्याही अनुग्रहाखातर दलालांनी आपल्या मतांना मुरड घातली नाही की भीड-भाड मानली नाही. आवडलं त्याला मान डुलवली. काळजाला भिडलं त्याच्याशी उबदार हस्तांदोलन केलं. मोरावियाच्या ' टू विमेन ' कादंबरीवर मेट्रोने काढलेला चित्रपट त्यांना बेफाट आवडला होता. तो त्यांनी नावाजत परत परत पाहिला. भाव्यांची ' अकुलीना ' ही त्यांची आवडती कादंबरी होती. अभिषेकींच्या मिष्ट नाट्यसंगिताबद्दल ते म्हणायचे, " परंपरा पचवणं म्हणजे काय ह्याचं जितेंद्र हे उत्तम उदाहरण आहे. " ना. श्री. बेंद्रे यांच्या कुंचल्यावर ते लट्टू होते. विजय तेंडुलकरांची ' कोंवळी उन्हे ' त्यांना फार सुखद वाटली होती. व्यंकटेश माडगूळ-करांनी केलेले ' सती 'चे वाचन ते विसरूच शकत नव्हते. रॉय किणीकरांच्या " येग येग विठाबाई "चा प्रयोग त्यांना चित्तवेधक वाटला होता. अलीकडे ' माणूस 'मधून प्रसिद्ध झालेल्या अनिल बर्वे ह्यांच्या " रोखलेल्या बंदुका " ह्या लेखमालेने ते थरारून गेले होते. ह. मो. मराठेंची ' निष्पर्ण वृक्षावर ' वाचून ते उस्फूर्त उद्गारले, " ह्याला म्हणतात मॉडर्न रायटिंग. नव्या लेखकांना म्हणावं, लेको, असं लिहा ! " बोटचेपेपण त्यांच्यापाशी औषधालाही नव्हतं. अनेक खंद्या लेखकांना बाळगून असणाऱ्या एका प्रकाशकाला त्यांनी तोंडावर सांगितलं, " तुमच्या ह्या मतलबी आदरसत्कारांच्या भडीमारामुळे लेखकांना तुम्ही मिंधे करता. शोभतं हे तुम्हाला ?" अर्थात, ज्यांची बाजू दलाल घेत होते त्या लेखकांचे दलालांना आलेले अनुभव उबदार होतेच असं नाही. पण लेखक आणि कलावंत ह्या दोन जातींबद्दल दलालांना उत्कट ममत्व होतं. त्यागावर त्यांचा विश्वास नव्हता. जे उद्बोधन् आणि उन्नयन करतात, जे आशयघन लेखन करतात त्यांना सुखसमृद्धीतच राहता आलं पाहिजे असा त्यांचा हेका होता. सतत सणसणीत पैसे मिळवीत आलेला कलावंत ही त्यांची यत्ता होती. त्यांचा त्यांना अभिमान होता. मात्र, गर्व नव्हता.

दलालांना स्वत:बद्दल बोलायला लावायचं हे फार बिकट कर्म होतं. सावंत-वाडीकडच्या पंडित कुटुंबातून आलेल्या सौ. सुमतीबाई दलाल सुंदर चित्रं काढीत. त्यांची एक जलरंगातली नितळ कृती फार वर्षांपूर्वी " मौज " दिवाळी अंकात आली होती. अलीकडेच मी त्याबद्दल विचारलं तेव्हा ते फक्त तीनच शब्द उद्-गारले, " हल्ली नाही काढत. " त्यांची मुलगी प्रतिमा चित्रकला शिकते आहे.

तिचा हात कसा आहे, अशी मी चौकशी केली. तेव्हा मात्र त्यांच्या चेहऱ्यावर खुषी झळकली. म्हणाले, " छानच काढते. काही काही वेळा माझा मीच चाट होतो ! पण ह्या पोरी सिरीयसली घेतील तेव्हा खरं. " मग मिनीटभर थांबून त्यांनी शेल्फ-वरचा एक फोल्डर काढला. त्यातले कागद उलटेसुलटे केले. एक कागद काढला. तो माझ्यासमोर धरला. त्याच्यावर धावत्या हरणाचं वगैरे काहीतरी चित्र होतं. ते चित्र दाखवीत म्हणाले, " हा बघा तिच्या ड्रॉईंगचा नमुना. कसं छान डिझाईन केलंय ! तिच्या वयाच्या मानाने हे फारच चांगलं आहे. " मी म्हटलं, " मग तुम्ही तिचे गुण आणि बलस्थानं तिला नीट समजून सांगा. " " नको, " दलाल चटकन उद्गारले, " आत्ताच स्तुती केली की ती डोक्यात जाईल. ती स्वतांच्या बुद्धीने जे काय काढत्याय ते काढू दे. " ह्याच्या पलीकडे ते स्वतःच्या कुटुंबाबद्दल कधीच बोलले नाहीत. ' दीपावली 'चा लेखकवर्ग मात्र ते कुटुंबासारखाच मानत आणि त्याबद्दल ते काही ना काही हंसत खेळत सांगत राहत. ' दीपावली 'ची मूळ शक्कल किणीकरांची. बाळ सामंत त्यावेळी संपादकीय साहाय्याला होते. मग खांदेपालट खूप झाला. ग. रा. कामत, विजय तेंडुलकर, भोबे, प्रभाकर अत्रे आगेमागे येऊन गेले. ह्यातल्या प्रत्येकाचे आंबटगोड किस्से ते भेळपुरी चापताना सुनवायचे. ' दीपा-वली 'चे त्या वेळचे आलंकृत रूप पाहून जाहिरातदारांनी जाहिरातींचा इतका वर्षाव केला, की आता जाहिराती स्वीकारणे बंद केले आहे, अशा तारा दलालांनी ठोकल्या. पुढे वार्षिक प्रकाशनात उपऱ्यांची गर्दी झाली. कमअस्सल नकला झाल्या. पण ' दीपावली 'चा दर्जेदार प्रथम क्रमांक अखेरपर्यंत शाबूत राहिला. दलालांना त्याचा रास्त अभिमान असे. ते व्याकुळ होत. ते मासिक ' दीपावली 'ला लोका-श्रय हव्या त्या किमान प्रमाणात मिळत नाही म्हणून. वर्षे न् वर्षे अभिरुचीसंपन्न साहित्य प्रसिद्ध करूनही ' दीपावली ' मासिकाच्या जमाखर्चाची तोंडमिळवणी करणे मुष्कील होई. छप्पन्न वेळा तरी त्यांनी मला सांगितलं असेल, " आता हे मासिक बंद करूया. कसं ? फक्त दिवाळी अंक तेवढा काढू. पाव शतक जिवाचा आटापीटा केल्यावरही जाहिराती स्वतः होऊन आपल्याकडे येत नाहीत ह्याचा अर्थ काय ? कुणी सांगितले आहेत हे धंदे ? केली एवढी साहित्यसेवा खूप झाली. " मी नको, नको म्हणे. साहित्यिकांच्या सहवासाला तुम्ही पारखे व्हाल असे सांगे. पण वाच-कांच्याच अभिरुचीचं अवमूल्यन झाल्यानंतर संपादक तरी काय करणार ? तरीही ते उलटया प्रवाहात ताज मारीत राहिले. गेल्या पाव शतकात अनेक लेखक-कवी-कलावंत त्यांचे ऋणाईत झाले. त्यांनी दलालांचा एक सत्कार करण्याचा डाव परवा परवा रचला. दलालांना पत्ता लागला. म्हणाले, " नाही; तुम्हीच मला साथ केलीत. मीच तुम्हाला खाऊपिऊ घालतो. " ऐकेचनात. नऊ जानेवारीचा मुहूर्त धरला. दोनशे निवडक मित्रांना त्यांनी थाटाची मेजवानी दिली. जितेंद्र अभिषेकींचं घरंदाज गाणं ऐकवलं. खास ' दीपावली 'चे म्हणून शिक्कामोर्तब

झालेले तीन पिढ्यांचे लेखक, प्रतिनिधी म्हणून व्यासपीठावर बसवले. ज्येष्ठ पिढीचे भावे-राजाध्यक्ष, नंतरच्या पिढीचे अरविंद गोखले–सिनिक. सध्याच्या चालू पिढीचे प्रभाकर पेंढारकर आणि मी स्वतः. प्रकाशझोतातल्या व्यासपीठावर मला भलतंच अवघडल्यासारखं झालं. दलालांनी दाखविलेल्या अगत्याने गुदमरायला झालं. कशी-बशी वेळ मारून नेली. रौप्यरजनीचा सोहळा दृष्ट लागावी इतका मधुर झाला. भरीला, मी दलालांवर ' माणूस 'मध्ये टिपण लिहिलं. ते वाचल्यावर मला कोपरा-पासून नमस्कार करीत म्हणाले, " गुरु, नमस्कार असो तुम्हाला ! आपण खाज-गीत बोललो ते तुम्ही असं छापूनही टाकलंत ? आता लोक माझ्याकडे रेसेसच्या टिप्स मागायला लागतील ! पण हरकत नाही. मात्र, " तापट " हे तुम्ही मला लावलेलं विशेषण पटलं बुवा. माझी बायकोही मला म्हणते कशाला तापता म्हणून ! पण आहे ते आहे. आपलं डोकं गरम आहे आणि आपल्याला खरं खरं लिहिलेलं आवडतं. " दलालांना ओळखणारे लोक सांगतात की ऐन तारुण्यात दलाल म्हणजे नुसती आग होती. कुणाचा मुलाहिजा ठेवीत नसत. वागळे हे त्यांचे हिशेबनीस, शिवाय वर्गमित्रही. पण वागळ्यांनाही तोडून बोलले. वागळे भडकले. त्यांनी राजी-नामा दिला. मग दलाल थंडपणे त्यांना म्हणाले, " वागळे, संतापणं हा माझा स्वभावदोष आहे. तुम्ही गैरसमज करून घेऊ नका. " वागळे राहिले. अखेर, बऱ्या-वाईट स्वभावदोषांसहीतच आपल्याला निकटवर्तीयांना स्वीकारावं लागतं.

शनिवारी रौप्यरजनी आटोपली. दलालांना हलकं वाटलं. आम्हालाही पोटभर बरं वाटलं. सोमवारी ऐसपैस गप्पा झाल्या. ' लंडन ' विशेषांक प्रसिद्ध करून त्यांनी मराठी मासिकांच्या विश्वात नवंच पर्व उघडलं. तो ताजा अंक मला दिला. त्या अंकाच्या संपादनात मदत करणारे लंडनचे रहिवासी मुकुंद सोनपाटकी रौप्यरजनी-साठी मुंबईला मुद्दाम आले होते. त्यांचं मी आकाशवाणीवर लंडनविषयक भाषण मुक्रर केलं. दलालांना त्याचा फार संतोष झाला. ' लंडन ' विशेषांकाचं प्रकाशनही खुद्द लंडनमध्येच येत्या महिन्यात वाजतगाजत करायचं त्यांनी पक्कं केलं. त्यांच्या कर्तृत्वाचा सगळीकडे जयजयकारच चालला होता. आम्ही रौप्यरजनीबद्दल बोलत होतो. मग कशावरून तरी बोलणं मृत्यूकडे वळलं. शिरवईकर म्हणून त्यांचे स्नेही किडनीच्या विकाराने इस्पितळात शेवटच्या घटका मोजीत होते. मृत्यूने शिरवई-करांचा घेतलेला कबजा पाहून दलाल मनोमनी चरकले होते. मला म्हणाले, " काय तब्बेतशीर माणूस होता हो शिरवईकर; पण आता दोन शब्द बोलायचे त्राण उरलेलं नाही त्यांना. मी त्यांचा हात हातात घेतला. हॉस्पिटलात तर शब्द उमटेना त्यांच्या तोंडून ! दोन महिने मृत्यू त्यांना नुसता कुरतडतो आहे ! " मग बोलणं अत्र्यांकडे वळलं. म्हणाले, " काय सांगू तुम्हाला ! अत्र्यांना भेटायला मी शेवटी हॉस्पिटलात गेलो होतो. मुळात तो दांडगा माणूस. शेवटी सुजला ! त्याचा रंगही बदलला ! नको–नको, असं मरण नको बुवा. " मग गाडी पुन्हा रुळावर

आली. आशुतोष ह्या त्यांच्या लाडक्या नातवाचा नवा फोटो दाखवून म्हणाले, "ह्रा लबाड माझ्याकडेच जास्त रमतो!" कुमार औषधालयाचा काहीतरी उत्सव सांगलीकडे होणार होता. त्यासाठी सांगलीला परांजपे वैद्यांकडे जायचं त्यांनी ठरवलं. तिथे ते परांजप्यांना आपली तब्येतही दाखविणार होते. नाही म्हटलं तरी अलीकडे त्यांना अस्वस्थ वाटत होतंच. त्यांनी आपल्या हृदयाची वैद्यकीय तपासणीही चार–सहा महिन्यांपूर्वी करून घेतली होती. पण कार्डीओग्राफमध्ये सर्व आलबेल असल्याचं दिसलं होतं! ते निश्चित झाले.


गुरुवार उजाडला. शिरवईकर वारले. त्यांचं मरण पाहून दलाल आतल्या आत एकदम खचले. त्यांचा मृतदेह पाहायला परत परत ओढून न्यावं तसं तीन वेळा गेले. अंत्ययात्रेलाही गेले. चालता बोलता जिवंत माणूस आयुष्यापासून निखळून पडतो, ह्या वस्तुस्थितीने ते परमावधीचे व्याकुळ झाले. जन्ममरणाच्या चक्रनेमिक्रमणाची चेष्टिते पाहून ते ढेपाळले. घरी परतल्यावर त्यांना आपलं अंग तापलं आहे असं वाटलं.

शुक्रवार उजाडला. अंग तापलेलंच होतं. आपल्याला फ्लू झाला असावा असं त्यांना वाटलं. स्टुडिओत फोन करून त्यांनी आज आपण कामाला येणार नसल्याचं कळवलं. कोडोपायरीनची एक गोळी घेतली. मग अंमळ बरं वाटलं. म्हणाले, "आता मला बरं वाटतंय. मी स्टुडिओत जातो." घरची माणसं विश्रांती घ्या म्हणाली. विश्रांती हा शब्दच ठाऊक नसलेल्या दलालांनी ऐकलं नाही. टॅक्सी करून ते केनेडी पुलावरल्या आपल्या स्टुडिओत हजर झाले. माणसांची आवक जावक सुरू झाली. त्या सर्वांना ते शिरवईकरांच्या मृत्यूबद्दल घोळून घोळून सांगू लागले. म्हणाले, "ती विजेची भट्टी किती स्वच्छ असते हो नि बघता बघता तिथे माणसाचं भस्म होतं!" सोनपाटकींचा फोन आला. लंडनअंकाच्या लंडनमधील प्रकाशन समारंभाबद्दलचं बोलणं पक्कं झालं. श्रीराम कामतांना पाठवलेल्या चेकबद्दल काहीतरी कटकट निर्माण झाली म्हणून वागळ्यांबरोबर बँकेत जाऊन आले. पुण्याहून पंडित कुलकर्ण्यांचा पुण्याला रौप्यमहोत्सवासाठी येण्याचा ट्रंककॉल आला. म्हणाले, "येतो." सुभाष धामणकरला म्हणाले, "मी उद्या पुण्याला जातोय. माझं उद्याच्या डेक्कनचं एक तिकीट रिझर्व करून आणा." नंतर त्यांच्या आशुतोष ह्या आवडत्या नातवाचा घरून फोन आला, "बाबा, तुम्हाला बरं आहे? तुम्ही घरी या. मी वाट बघतोय." त्याला म्हणाले, "पिश, मी पंधरा-वीस मिनिटात येतो हं. तू थांब." नेहमीपेक्षा तासभर लवकरच त्यांनी स्टुडिओ सोडला. टॅक्सीने दादरला घरी परतले. घराचा जिना चढतानाच त्यांना कमालीचा थकवा आला. जिन्यात जावई सुरेश कर्णिक भेटले. दलालांचा गळलेला चेहरा पाहून ते चरकून म्हणाले, "आज इतके कसे दमलेले दिसता?" दलाल म्हणाले, "पहिल्या पायरीवर होतो तेव्हा वाटलं, मी मुळी वरपर्यंत पोचूच शकणार नाही!" तशा मरगळ-

लेल्या स्थितीत ते तीन मजले चढून गेले. दारात लाडका पपिश भेटल्यावर एकदम फुलले. वेदना विसरले. घरच्यांच्या आग्रहास्तव त्यांनी व्हिटॅमीनची गोळी आणि लिंबूपाणी घेतलं. त्यांना फारच बरं वाटायला लागलं. पपिशबरोबर खेळले. रौप्य-रजनीच्या सोहोळ्यातल्या भाषणांची टेप त्यांनी लावली. एकीकडे टेप ऐकत, पपिशबरोबर खेळत, त्यांनी चवदार जेवण घेतलं. अर्ध्या तासाने जावयांचा तब्बेतीच्या चौकशीचा फोन आला. म्हणाले, "ठीक आहे. पण एकसारखा घाम येतोय." जावयांनी जाणलं. परस्परच डॉक्टरांना बोलावून घेतलं. मित्रवर्य डॉक्टर आजगावकर आले. त्यांनी निदान केलं. हॉस्पिटलातच जाणं आवश्यक ठरलं. दलाल म्हणाले, "जाऊया, पण मला काहीही होत नाही. मी जिने पायीच उतरतो." शेवटी आज्ञा म्हणून खुर्चीत बसले. खुर्चीवरून खाली जाताना लेकींना म्हणाले, "तुम्ही भिऊ नका. मी चार दिवस विश्रांती घेऊन परत येईन." रात्री अकरा वाजून वीस मिनिटांनी बॉम्बे हॉस्पिटलात त्यांना दाखल करण्यात आलं. तातडीची वैद्यकीय उपाययोजना सुरू झाली. नाडी मंद मंद होत चालली. सलाईनची सुई टोचताना त्यांना फार वेदना झाल्या. एकदम ओरडले. अशी काही मिनिटं गेली. दलालांनी डोळे फिरवले. त्यांच्या हृदयाचं यंत्र अकस्मात बंद पडलं. डॉक्टरांनी भेदरलेल्या आप्तांना सांगितलं, "आम्ही शिकस्त केली. सर्व मानवी उपाय हरले आहेत." घड्याळात तेव्हा रात्रीचे अकरा वाजून पन्नास मिनिटे झाली होती.

अखेर ही अशी व्हायची होती!

काळपुरुष एक झपाटलेला कलावंत आहे. हातातला ब्रश म्हणून कसा तो कधी सुकू देत नाही, की रंगाची पेटी कधी बंद कधीत नाही. तो सतत मानवी जीवनाचे कागद रंगवीत राहतो आणि रंगवता रंगवता एकीकडे अक्राळविक्राळ हसत राहतो. त्याच्या त्या हसण्याचा भेसूर आवाज अधूनमधून आपल्या कानावर हा असा आस-भास नसताना पडतो; आपण क्षणभर दुभंगतो!



# उत्तरप्रदेशात इंदिराविजयाचे वारे

**वा. दा. रानडे**

उत्तर प्रदेशमधील मणिराम विधानसभा पोटनिवडणुकीत सिंडिकेट काँग्रेसचे मुख्यमंत्री त्रिभुवन नारायण सिंग यांचा थोडचा थोडक्या नव्हे तर सोळा हजारावर मतांनी दणदणीत पराभव करून इंदिरा काँग्रेसचे उमेदवार रामकृष्ण द्विवेदी निवडून आले. लोकसभा निवडणुकीच्या ऐन तोंडाशी सत्तारूढ संयुक्त विधायक-दलाच्या मुख्यमंत्र्यांचा हा प्रचंड पराभव सिंडिकेट काँग्रेसच्या नेतृत्वाखालील आघाडीस फार महागात पडणार आहे.

सिंडिकेट आघाडीचे सरकार स्थापून उत्तर प्रदेशचा गड आपण जिंकला. त्या जोरावर दिल्लीचा गडही सर करून निदान इंदिरा गांधींच्या पक्षाला हुकमी बहुमत निश्चित मिळू देणार नाही अशी आशा सिंडिकेट आघाडीच्या नेत्यांना वाटत होती पण उत्तर प्रदेशमधील त्यांच्या गडाचा गडकटीचा इंदिरा काँग्रेसच्या एका साध्या सैनिकाने मणिराम पोटनिवडणुकीत गारद केला. हा गड भक्कम नाही. त्याला सहज खिंडार पाडता येते हे या विजयाने दाखवून दिले. 'लढाई हरलो पण युद्ध जिंकू', अशा थाटात मणिरामला हार खाल्ली तरी लोकसभा निवडणूक आपण जिंकू असे सांगून आपल्या कार्यकर्त्यांना धीर देण्याचा प्रयत्न सिंडिकेट आघाडीचे नेते करीत असले तरी या पराभवाने निर्माण झालेल्या वातावरणाचा परिणाम नाहीसा करणे त्यांना फार जड जाणार आहे. कारण लोकमताचा लंबक एकदा एका बाजूस सरकू लागला की तो पुन: दुसऱ्या बाजूस वळविणे फार कठीण असते. सर्वसामान्य जनतेत इंदिरा काँग्रेसला अनुकूल आणि सिंडिकेट आघाडीला प्रतिकूल वातावरण तयार होण्यास या छोटयाशा निवडणुकीने मोठी मदत झाली आहे. उत्तर प्रदेशात चांगले यश इंदिरा काँग्रेसने मिळविले तर लोकसभेत हुकमी बहुमत-

सुद्धा त्या पक्षाला मिळण्याची शक्यता आता निर्माण झाली आहे आणि असे हुकमी बहुमत इंदिरा गांधींनी मिळविले तर त्याची सुरुवात मणिरामच्या विजयाने झाली अशीच नोंद निवडणुकीच्या अभ्यासकांना करावी लागेल.

बदलत्या लोकमताची नीट कल्पना येण्यासाठी मणिराम विधानसभेच्या केवळ या निवडणुकीचा नव्हे तर गेल्या याच निवडणुकांचा तुलनात्मक विचार केला पाहिजे. काँग्रेसच्या दृष्टीने हा सुरक्षित मतदारसघ नव्हता. १९५७ ची निवडणूक काँग्रेसने जिकली होती व त्यानंतर १९६२, १९६७ व १९६९ या तीन निवडणुका लागोपाठ गमावल्या होत्या.

मणिरामच्या पाच निवडणुकात काँग्रेसला किती मते मिळाली व किती मतांनी काँग्रेसचा जय किंवा पराजय झाला याची कल्पना पुढील आकड्यांवरून येईल.

## मणिराम विधानसभा निवडणुका

| वर्ष | काँग्रेसची मते | किती मतांनी जय/पराजय |
|---|---|---|
| १९५७ | २०,८३२ | ५६७९ मतांनी जय |
| १९६२ | १७,६६४ | ११,३३७ मतांनी पराभव |
| १९६७ | १८,०३९ | ६७०७ मतांनी पराभव |
| १९६९ | १६,६६३ | २९८१ मतांनी पराभव |
| १९७१ | ३३,२३० | १६,०९३ मतांनी जय |

यातील पहिल्या चार निवडणुकातील काँग्रेसची मते अविभक्त काँग्रेसची व १९७१ च्या निवडणुकीतील मते इंदिरा काँग्रेसची आहेत. सिंडिकेट काँग्रेस पक्षाचे मुख्यमंत्री त्रिभुवन नारायण सिंग १६,०९३ मतांनी पराभत झाले. त्यांना पडलेली १७१३७ मते केवळ सिंडिकेट काँग्रेसची नाहीत. जनसंघ संयुक्तसमाजवादी, स्वतंत्र पक्ष, भारतीय क्रांतिदल आणि गेल्या तीन निवडणुकातील विजयी उमेदवार महत अवैद्यनाथ यांच्या गटाने सिंग यांना पाठिंबा दिला होता. तेव्हा त्रिभुवन नारायण सिंग यांना मिळालेल्या मतांमध्ये या सर्वांच्या मतांचा समावेश आहे.

मणिरामच्या गेल्या तीन निवडणुकात काँग्रेसची मते १९५७ पेक्षा घटली होती. इंदिरा काँग्रेसचे उमेदवार द्विवेदींनी यावेळी ही घट भरून काढली एवढीच नव्हे तर १९५७ पेक्षा १२,३९८ मते जास्त मिळविली. १९६९ च्या निवडणुकीत काँग्रेसला सर्वात कमी १६,३६३ मते मिळाली होती. त्यापेक्षा या वेळी १६,५६७ मते जास्त मिळाली. या मतदारसंघात लोकमताचा कल इंदिरा काँग्रेसकडे मोठ्या प्रमाणात झुकला आहे हेच यावरून सिद्ध होते. पराभूत मुख्यमंत्री त्रिभुवन नारायण सिंग यांना पाठिंबा देणाऱ्या पक्षांची एकत्रित मते १९६९ मध्ये ५६·३ टक्के होती. ती या वेळी २७·८ टक्केपर्यंत खाली आली. उलट काँग्रेसमधील फुटीनंतर ही निवडणूक झाली असताही इंदिरा काँग्रेसला या वेळी ५३·९ टक्के मते मिळाली. अवि-

भक्त काँग्रेसला १९६९ च्या निवडणुकीत फक्त ३०·२९ टक्के मते मिळाली होती.

हिंदुमहासभेचे महंत अवैद्यनाथ हे या भागातील एक वजनदार नेते. १९६२, १९६७, १९६९ या तीन निवडणुका त्यांनी लागोपाठ जिंकल्या. यापैकी १९६२ ची निवडणूक त्यांनी हिंदुमहासभेच्या तिकिटावर लढविली पण त्यानंतरच्या दोन निवडणुकात ते अपक्ष म्हणून विजयी झाले. तिन्ही निवडणुकीत ते विजयी झाले खरे पण त्यांचा प्रभाव ओसरू लागला होता. १९६२ मध्ये २९,००१, १९६७ मध्ये २४,७४६ व १९६९ मध्ये १९६४४ याप्रमाणे त्यांची मते पाच-पाच हजारांनी घटत गेली. १९६९ मध्ये ते अवघ्या २९८१ मतांनी निवडून आले होते.

इंदिरा काँग्रेसच्या उमेदवारास कम्युनिस्ट व प्रजासमाजवादी पक्षाच्या एका गटाने पाठिंबा दिला हे खरे पण या मतदारसंघात या दोन्ही पक्षांचे वजन फार थोडे असून त्यांच्या पाठिंब्याशिवायही द्विवेदी विजयी झाले असते हे त्यांच्या दणदणीत विजयावरून स्पष्ट होते.

## मुसलमान व हरिजन मते

द्विवेदींच्या विजयाचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे मुसलमान व हरिजन यांची मते त्यांनी मिळविली. लोकसभा निवडणुकीत याच दोन समाजाची मते निर्णायक ठरून उत्तर प्रदेशात विजयाचे पारडे इंदिरा गांधींच्या पक्षाकडे झुकण्याची शक्यता आहे.

उत्तर प्रदेशातील लोकसभेच्या एकूण ८५ जागांमध्ये हरिजनांच्या जागा १८ आहेत. १९६७ मध्ये या १८ पैकी १४ जागा काँग्रेसने जिंकल्या होत्या व बाकीच्या चार जागांमध्ये दोन संयुक्त समाजवादी, एक प्रजासमाजवादी व एक रिपब्लिकन पक्षास मिळाली होती. सर्व अठरा उमेदवारांनी या जागा ५० टक्क्यांपेक्षा कमी मते मिळवून जिंकल्या होत्या. या मतदारसंघांचा अधिक तपशीलवार विचार केला तर असे दिसते, की काँग्रेसने मिशरिखची जागा ५००० पेक्षा कमी मतांनी, रामसेनी घाट जागा १३००० वर मतांनी, बस्ती जागा १९ हजारावर मतांनी, सैदपूर जागा १४००० पेक्षा कमी मतांनी रॉबर्टसगंज जागा १७ हजार मतांनी जलौन जागा २४ हजारावर मतांनी आणि सहारणपूर जागा ३७ हजारावर मतांनी गेल्या निवडणुकीत जिंकली आहे. या सात मतदारसंघात सध्या सिंडिकेटच्या आघाडीत असलेल्या पक्षांना मिळून त्या वेळी काँग्रेसपेक्षा जास्त मते मिळाली आहेत म्हणजे या मतदारसंघात सिंडिकेट आघाडीने बळ एकवटले तर त्या त्यांना मिळण्याचा संभव आहे.

उत्तर प्रदेशातील लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने दुसरा महत्त्वाचा निर्णायक घटक मुस्लीम मतांचा. गेल्या वेळी बहुसंख्य मुस्लिमांनी काँग्रेसविरुद्ध मते दिली. काँग्रेसने सहा उमेदवार उभे केले. त्यापैकी फक्त एक निवडून आला. विरोधी पक्षांचे चार मुस्लीम उमेदवार निवडून आले. त्यात दोन उजव्या कम्युनिस्ट पक्षाचे,

एक संयुक्त समाजवादी पक्षाचा व एक स्वतंत्र पक्षाचा आहे. गेल्या वेळची निवडणूक आणि या वेळची निवडणूक यातील एक महत्त्वाचा फरक म्हणजे मुस्लीम लीग यावेळी उत्तरप्रदेशात प्रथमच निवडणूक लढविणार आहे. मुस्लीम बहुसंख्य वस्तीच्या भागात मुस्लीम लीग आपल्याच उमेदवारांना निवडून आणण्याचा प्रयत्न करील व जेथे अशी शक्यता नाही तेथे इंदिरा काँग्रेस व उजवे कम्युनिस्ट यांना पाठिंबा देईल. जनसंघाशी आघाडी करणाऱ्या संयुक्त समाजवादी पक्ष, स्वतंत्र पक्ष आणि सिंडिकेट काँग्रेसला मुस्लिमांची मते मिळण्याचा संभव फार कमी आहे.

पन्नास टक्क्यापेक्षा अधिक मुस्लीम मतदार असलेल्या उत्तर प्रदेशात एक मतदार-संघ आहे. ही जागा मुस्लीम लीगलाच मिळण्याची सर्वात जास्त शक्यता आहे. तीस ते चाळीस टक्के मुस्लीम मते असलेले पाच मतदारसंघ आहेत. मुस्लीम लीग या जागाही मिळविण्याचा प्रयत्न करील, पण जेथे इंदिरा काँग्रेस किंवा कम्युनिस्ट पक्षाचा मुस्लीम उमेदवार निवडणूक देण्याचा अधिक संभव असेल तेथे मुस्लीम मते त्यांना देण्याचा आदेश लीग देईल. वीस ते तीस टक्के मुस्लीम मते असलेले चार मतदारसंघ आहेत. तेथेही मुस्लीम मतदार विजयाचे पारडे मुस्लीम मतदार इंदिरा काँग्रेसच्या किंवा कम्युनिस्टांच्या बाजूने फिरवू शकतील. यावरून उत्तर प्रदेशांतील किमान दहा मतदारसंघात मुस्लिमांच्या विरोधामुळे सिंडिकेट आघाडीस यशाची शक्यता फार थोडी आहे. इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक ओपिनियनने केलेल्या पाहणीत ६१ टक्के मुस्लिमांचा इंदिरा काँग्रेसला पाठिंबा असल्याचे दिसून आले.


उत्तर प्रदेशमधील ८५ जागांपैकी ७५ जागा उमेदवारांनी गेल्या वेळी ५० टक्क्यापेक्षा कमी मते मिळवून जिंकल्या. यापैकी ४६ जागा काँग्रेसला मिळाल्या होत्या. काँग्रेसविरोधी मते विभागली गेल्यामुळेच या जागा काँग्रेसला जिंकता आल्या हे उघड आहे. हरिजन जागांचा विचार वर केलाच आहे. इतर जागांपैकी ओनळा, शहाजहानपूर अमेठी, पेद्रोणा, देवरिया, बालिया, आझमगड, अलाहाबाद, बिल्हारे, फरुकाबाद, काशगंज, एटाह, या बारा मतदारसंघातच सिंडिकेट आघाडीत सध्या असलेल्या पक्षांना १९६७ मध्ये एकत्रित मते काँग्रेसपेक्षा जास्त मिळालेली आहेत. आघाडीने बळ एकवटल्यास या जागा त्यांना मिळण्याचा संभव आहे. पण बाकीच्या बहुसंख्य जागा अनेक उमेदवारातील लढतीचा फायदा मिळून इंडिया काँग्रेसलाच मिळण्याची शक्यता अधिक आहे.

## चरणसिंगांचा प्रभाव

चरणसिंगांचा गट १९६७ च्या निवडणुकीचे वेळी काँग्रेसमध्ये होता. त्या गटाची मते या वेळी इंडिरा काँग्रेसला मिळणार नाहीत पण त्याचबरोबर सिंडिकेट आघाडी-लाही ती मिळतील असे नाही. जास्तीत जास्त जागा आघाडीने देऊ केल्या तरच

चरणसिंगांचा भारतीय क्रांतिदल पक्ष आघाडीशी समझोता करील. तीही शक्यता थोडी आहे. काही मतदारसंघात मुस्लिमांवर भारतीय क्रांतिदलाचा प्रभाव आहे. जनसंघ असलेल्या आघाडीत सामील होऊन ही मते चरणसिंगांचा पक्ष गमावणार नाही. उत्तर प्रदेशच्या पश्चिम भागात भारतीय क्रांतिदलाचा विशेष प्रभाव आहे. इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक ओपनियन या संस्थेने केलेल्या पाहणीत या पक्षाला वीस टक्के लोकांचा पाठिंबा असल्याचे दिसून आले. सिंडिकेट काँग्रेस, जनसंघ व संयुक्त समाजवादी या पक्षांना मिळून ३५ टक्के लोकांनी पाठिंबा दर्शविला पण याच पाहणीनुसार इंदिरा काँग्रेसला ३७ टक्के लोकांचा पाठिंबा असल्याचे दिसून आले. १९६९ च्या पोटनिवडणुकीत अविभक्त काँग्रेसने ३४ टक्के मते मिळविली होती. काँग्रेसमधील फुटीनंतर इंदिरा-काँग्रेसचे बळ न घटता उलट वाढले असाच याचा अर्थ आहे आणि मणिराम निवडणुकीतील विजयाने तर या निष्कर्षाला चांगलीच पुष्टी मिळाली आहे. या पाहणीत सिंडिकेट काँग्रेसकडे फक्त आठ टक्के लोकांचा कल असल्याचे दिसून आले.

लोकमताचा पाठिंबा इंदिरा काँग्रेसला अधिक वाढला असला तरी ८५ पैकी एकतृतीयांश म्हणजे २७–२८ पेक्षा अधिक जागा इंदिरा काँग्रेसला मिळण्याचा संभव नाही असे इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक ओपिनियनचे डी कोस्टा यांचा अंदाज आहे पण निवडणुकीत अखेर महत्त्व असते ते वातावरण निर्मितीचे. मणिराम निवडणुकीने इंदिरा काँग्रेसला अनुकूल वातावरण निर्माण झाले असून लोकमताचा तिकडे झपाटयाने सरकलेला लंबक लक्षात घेता उत्तर प्रदेशात इंदिरा काँग्रेस बहुसंख्य जागा मिळविण्याचा संभव आहे. अर्थात या विजयाने काँग्रेसनेते गाफील झाले नाहीत तरच हे शक्य आहे. उमेदवारीचे अर्ज मागे घेतले गेल्यानंतर प्रत्यक्ष रणांगणात कोण उभे राहतात, बहुरंगी सामने किती होतात हे स्पष्ट झाल्यावर याबद्दल अधिक निश्चितपणे अंदाज करता येईल.





# पिंड

वैजनाथ महाजन

आयुष्यात त्याला आज प्रथमच इतके वाईट वाटले. क्षणभर त्याच्या डोळ्यात पाणी थरारले. पण दुसऱ्याच क्षणी तो भानावर आला. उगाचच त्याचा दुसरा हात डोळ्याकडे गेला. त्याच्या हातात आत्ता हेच पोस्टमनने दिलेले पत्र होते. ऑफीसला थोडासा वेळ झाला म्हणून तो घाईघाईने ऑफीसला चालला होता. एवढ्यात पोस्टमनने त्याच्या हातात पत्र दिले होते. त्याच्याच नावावर होते म्हणून त्याने पाहिले. पत्र वाचले—आणि क्षणभर तो जागीच स्थिरावला. त्याची आवडती आजी गेलेली होती. आजी आजारी होती तेव्हापासून त्याचे कशातच लक्ष लागेनासे झाले होते. आजीनेच त्याला लहानाचा मोठा केला होता. क्षणार्धात त्याला आपले गावाकडे गेलेले बालपण आठवले. आजी आपल्याला थोपटवून झोपवत असे. स्वयंपाक घरातील मधल्या खांबाजवळ ती आपल्यासाठी न चुकता रोज भाकरी-लोणी आणि काकवी झाकून ठेवीत असे. रोज पूजा आटोपल्यावर नैवेद्याचा खडीसाखरेचा खडा आपल्याला देत असे. तिचे सोवळे फारच कडक असायचे. तिची देवभक्ती ही काही औरच होती. तिचे उपासही भरपूर असायचे. तिच्या सोवळ्यामुळे व तिच्या देवभक्तीमुळे ती उभ्या गावाला ठाऊक होती. सारे गाव तिला मानत होते. आपल्या

घराण्यात तिच्याइतके वडील माणूसही नव्हते. ओढयावरचा दत्त, पेठेतील अंबाबाई व स्टँडवरील मारुती ही तिची कायमची श्रद्धास्थाने होती. गावात असल्यावर ती एक दिवसही ह्यांच्या दर्शनाशिवाय राहीली नाही.

आपण तिचे लाडके नातू होतो. आपल्याला कधी खेळून घरी परतण्यास उशीर झाला तर तिचा जीव हुरहुरू लागे. काही न सुचून ती घरात इकडे तिकडे करू लागे. आपल्या बाबांना ती जेव्हा अरेतुरेने हाका मारायची व जवळ बसवून घेऊन त्यांच्या पाठीवरून हात फिरवायची तेव्हा आपल्याला खूप गंमत वाटायची. आपण माजघरातील अंधारात उभे राहून ती गंमत पहात बसायची. आपल्याला जवळ घेऊन तिने आपल्या पाठीवरून हात फिरवला की आपल्यालाही निराळेच समाधान मिळायचे. त्या वेळी काय वाटायचे हे त्या वेळी आपल्याला नक्की सांगता आले नसते पण आज कळते आहे की ते एक दुर्लभ असे आगळे समाधान असायचे. आपण हौसेने तिचे पाय रगडले की ती खूष व्हायची व आपल्याला तोंडभर आशीर्वाद द्यायची. आपल्याला त्यावेळी तिच्या त्या आशीर्वादाचीही गंमत वाटायची.

अशी ही आपली आजी गेली याची त्याला आत्ता जाणीव झाली आणि त्याला आतून कालवल्यासारखे झाले. आपल्याला नक्की काय झाले आहे हेही त्याला कळेना. पण खोलवर आत कुठेतरी कच्‌कन काहीतरी बोचल्यासारखे झाले आहे एवढे मात्र त्याला कळले. एखादी आंतरिक वेदना आतल्या आत सलू लागल्यासारखे वाटू लागले.

आजीचे जास्त झाले तर तुला अगदी तारेने बोलवून घेतो असे निघताना बाबांनी त्याला चार-पाचदा सांगितले होते. त्यांच्या भरवंशावर तो इथे राहिला होता. आणि आज अकस्मात असे बाबांचे अगदी साधे पत्र आलेले होते. तार नाहीच. आजी पिकले पान झाल्यामुळे इतरांना तिच्यात विशेष स्वारस्य वाटत नव्हते हे तो जाणून होता. त्यात आणि अलीकडे ती मरण्यापूर्वी येणाऱ्या निमित्तमात्र आजाराने आजारी पडली होती. त्यामुळे सर्वांच्यावर तिच्या सेवेचा जुलूम लादला गेला होता. पण आजी काय होती हे फक्त तो एकटाच जाणत होता. बाबांनी लिहिले होते की आता अकारण येण्याची धावपळ करू नकोस. एकदमच दिवसालाच ये. त्याच वेळी चार-पांच दिवसांची रजा घे. बाकी पुढे 'ईश्वरी इच्छेपुढे इलाज नाही...' वगैरे सारा दिखाऊ मामला होता. आपल्या बाबांच्या ह्या असल्या विक्षिप्त स्वभावावर तो मनातून पुरा चिडून गेला.

तंद्रीतून जागे होताच तो घाईघाईने ऑफीसात गेला. एक दिवसाची रजा खर-डली व तसाच घरी येऊन पडला. सुन्न मनाने तो नुसता पडून राहिला. त्याला काहीही सुचेना. कशातही लक्ष लागेना. डोळ्यापुढे आजीचे केविलवाणे मतिक दिसू लागले. छेः आपले नशिबच फुटके म्हणून आजीचे शेवटचे दर्शन झाले नाही. अंत्य-समयी तिची सेवा करता आली नाही. त्याच्या नशिबाने त्याला मजबूर केले. मग

याच्या मनाने सर्वस्वी नशिबाला बोल लावला.

मध्यंतरीचे आठ दिवस मग याच विचारात गेले. खानावळ ऑफीस आणि पुन्हा घर या व्यतिरिक्त तो कुठेही गेला नाही. साऱ्यांची कंपनी सोडून त्याने एकलकोंडे-पणा जवळ केला. डोळ्यापुढून आजी हलत नव्हती. ह्या विषिण्ण मनःस्थितीच आठवडा गेला. आजीच्या दिवसासाठी त्याने रजा टाकली आणि तो सरळ गावाकडे गेला.

दिंडी-दरवाज्यातून तो सोप्यावर आला. तो सोप्यावर येताच सोप्यावर बसलेल्या मंडळींनी आपापले चेहरे थोडेसे गंभीर केले व नंतर त्याच्याच चौकशीस सुरुवात केली. रजा किती काढली ? कुठली गाडी पकडली ? रिझर्वेशन करावे लागले काय ? वगैरे...वगैरे. असल्या तांत्रिक व अगदी फालतू गोष्टीत ह्या लोकांनी दाखविलेला हा उत्साह पाहून त्याला वैताग आला. मग तो स्वयंपाकघराकडे वळला. तिथे बायकांकडून थोडेसे डोळे ओलावणे झाले. मग आजी कशी गेली, मृताचा नेहमी होणारा गौरव, गुणांची कृत्रिम उजळणी, ' तिचे सोने झाले, तिने जिंकले, कशात म्हणून तिची आशा राहिली नाही, साऱ्या गावकीला ती आईच्या ठिकाणी होती. आता गाव पोरका झाला ' या शब्दात साऱ्या बायकांच्याकडून थोडेसे औपचारिक कथन झाले. एकंदरीत सर्वांना जेवढ्यास तेवढेच दुःख झालेले दिसत होते. मग दिव-साच्या तयारीची गडबड सुरू झाली. त्या अन्नाकडे पाहून त्याला अन्नाची शिसारी बसली. त्या जेवणावळींना त्याने मनातून अक्षरशः लाखोली वाहिली.



पिंडदानाचा दिवस उजाडला. मारुतीच्या देवळाच्या वरच्या बाजूला जी पायऱ्यांची दरड होती तिथेच सारा क्रियाकर्माचा विधी होणार होता. पिंडाला नमस्कार करण्यासाठी आज साऱ्यांना बोलविण्यात आले होते. तो गेला तेव्हा भटजींनी पिंड मांडून ठेवलेले होते. घरातील सारी वडील मंडळी बाजूस बसलेली होती. क्रिया-कर्मे उरकलेले होते. त्याने जाऊन पिंडास नमस्कार केला व तोही तिथेच बाजूला बसला सारेजण कावळा शिवण्याची वाट पाहू लागले. सुमारे अर्धा तास झाला. जवळपास कावळाही फिरकत नव्हता. मधूनच दूरवर कुठेतरी काव् काव् ऐकू येत होती. बाकी सारे शांत होते. आसपासची सारी झाडेही अगदी निस्तब्ध होती. भटजी चिंताग्रस्त झालेले दिसत होते. मग भटजींनी कोणी काही म्हणून घेणार असल्यास म्हणून घ्या असे सांगितले.

मग बाबा उठले, आजपर्यंत केला तसाच यापुढेही घराचा सांभाळ करीन असे म्हणाले. मी आहे तोपर्यंत हे घर मोडू देत नाही आणि आपल्या एकत्र कुटुंबाला बाध येऊ देत नाही. तेव्हा आता आई तू कशात आशा ठेवू नकोस, असे म्हणून त्यांनी पिंडाला पुन्हा एकदा नमस्कार केला व डोळे पुसत पुसत बाजूस येऊन पुन्हा शून्यात दृष्टी लावून बसले. त्याने बाबांच्याकडे पाहिले. बाबा म्हणजे सहनशीलतेची कमाल मर्यादा होती. त्यानंतर त्याचे दोन्ही काका उठले. आम्ही न भांडता एकत्र राहतो, दादांचा प्रत्येक शब्द मानतो असे म्हणून नमस्कार करून पुन्हा जागेवर येऊन बसले. पण उपयोग झाला नाही. कावळा शिवण्याची चिन्हे दिसेनात. तोपर्यंत सुमारे दीड तास मोडला. साडे अकरा वाजून गेले. उन्हे चढू लागली. झाडाच्या सावलीने बसलेल्या चिमण्यांची चिव्चिव् मधूनमधून ऐकू येत होती. मधूनच एस्टचांचा आवाज ऐकू येत होता. पण काव् काव् कुठूनही ऐकू येत नव्हती.

मग बायका आल्या. त्याची आई व त्याच्या दोन्ही काकू डोळयांना पदर लावून काहीतरी बोलल्या व नमस्कार करून जरा बाजूला जाऊन काहीतरी कुजबुजू लागल्या. त्याची नजर एकसारखी आसपासच्या झाडांवरून भिरभिरत होती. आकाश धुंडाळत होती. मधूनच दोन कावळे अगदी जवळच्या आंब्यावर येऊन आशा लावून गेले होते. भटजी अगदी आंबून गेल्यासारखे दिसत होते. पण ते कावळे काही खाली आले नव्हते. आता पाऊण वाजला. भटजी दर्भाच्या कावळयाची भाषा करू लागले. बायकी कुजबूज वाढू लागली. एवढयात कुठून तरी उडत एक कावळा आला. आंब्याच्या झाडावरून ज्या सीताफळीखाली पिंड ठेवला होता त्या सीताफळीवर आला. सारी मंडळी निस्तब्ध होऊन त्या कावळयावर दृष्टी लावून बसली. दुसऱ्याच क्षणी भर्रकन कावळा खाली आला. आता तो पिंडाला शिवणार यात शंकाच नव्हती. हळूहळू लांबून फिरून तो पिंडाजवळ आला. इकडे तिकडे पाहत त्याने पिंडाला एक फेरी मारली आणि मग आपल्या लकबीने त्या पिंडाकडे

पहात उभा राहिला. सान्यांचे श्वास रोखले—एवढयात भर्रकन कावळा निघून गेला. सान्यानी पाहीपर्यंत तो पार दूर आभाळात निघूनही गेला. पुन्हा वातावरण विस्कटले व वैतागलेही.

या वेळपर्यंत दीड वाजला. बाबांच्या संमतीने भटजीनी मंत्र म्हणून दर्भाचा कावळा शिवविला. मग बायका घरी निघून गेल्या. म्हातारीच्या नावाने बोटे मोडायला आता सुना रिकाम्या झाल्या होत्या. ‘ म्हातारीला काय कमी पडले होते ?’ ‘ थेरडीला काय कमी पडले होते ?’ ‘ ह्या कुठल्या आल्यात सरळ मरायला ’ हे नको असलेले शब्द आता त्याला ऐकून घ्यावे लागणार होते. त्याची इच्छा नसली तरी ते शिश्याप्रमाणे त्याच्या कानात ओतले जाणार होते. मग सारी मंडळी उठून खाली ओढयावर आंघोळीला आली. रोवळीत घालून आणलेला दिवा तसाच रोवळीसकट पाण्यात सोडण्यात आला. दिवा दूरवर जाईपर्यंत तो रोवळीकडे एकटक पाहत होता. मग त्याने आंघोळ केली. तर्पण केले. स्वच्छ अंगाने पुन्हा मारुतीरायाचे दर्शन घ्यावे व मगच घरी जावे असा विचार करून तो पुन्हा वर आला आणि नकळत त्याची नजर पिंडाच्या जागेकडे गेली—

एक कावळा ते पिंड चोचीने विस्कटून टोची मारून मख्खपणे खात होता. कावळयाचे ते खाणे अगदी स्वस्थ चित्ताने चालले होते. आता मात्र त्याच्या डोक्यातून एकदम सणक आली. तो पुरा वैतागला. झट्कन त्याने पायातील एक दगड उचलला व नेम धरून जोराने कावळयाच्या दिशेने भिरकावला. त्या दगडाने अलगद कावळा टिपला. क्षणभर कावळयाची विलक्षण तडफड झाली. पंख फडफडत राहिले. आणि मग तो कावळा जो त्या पिंडावर पडला तो कायमचाच. तो मात्र आता एका आगळयाच समाधानाने मारुतीच्या देवळाकडे चालू लागला.




**वि. स. वाळिंबे : उत्तरार्ध : लेखांक एक**

द गॉलचे मन भडकून उठावे अशी ही परिस्थिती होती.

हिटलरच्या एका तडाख्यासरशी फ्रान्ससारखा विशालकाय देश सारे त्राण हरवून बसावा ही गोष्ट त्याच्या मनाला समजू शकत नव्हती. एकदा युद्धात उतरले की, आपण ते जिंकणार आहोत अशी जिद्द मनावर गोंदवून लढले पाहिजे, अखेरपर्यंत झुंजले पाहिजे अशा विश्वासावर या रणशार्दुलाचे मन पोसले गेले होते. त्यामुळे, आपली पितृभूमी न लढताच शत्रूपुढे नतमस्तक झाली हा अपमान त्याचे अंतःकरण कुरतडत होता.

त्याचे दुःख एवढेच नव्हते. आपण एकाकी पडलेलो आहोत ही जाणीव तर जीवघेणी होती. मानवी जीवनात उपेक्षेइतके दारूण दुःख नसते हे तो यावेळी अनुभवत होता.

द गॉल स्वतःच्या मनाला बजावत होता, ' फ्रान्सच्या वैभवाची आधारशिला ठरलेला उत्तर भाग हिटलरच्या टाचाखाली रगडला जात आहे; हरकत नाही, निस-

र्गाचं भरघोस वरदान लाभलेली आपली दक्षिण भूमी, कणा गमावून बसलेल्या पेताँ सरकारच्या अधिसत्तेखाली गेली आहे, ठीक आहे. पण अजून उत्तर आफ्रिकेतलं आपलं साम्राज्य शाबूत आहे. त्या साम्राज्यानं आपल्याला साथ दिली तर ही विपरीत परिस्थिती निवळायला फारसा वेळ लागणार नाही. मात्र हे एवढे घडायला हवं. तातडीनं घडायला हवं.'

ही धडपड करण्यासाठी तर तो लंडनला आलेला होता.

त्याने उत्तर आफ्रिकेतील फ्रेंच सरसेनानी जनरल नोग्युए याला लिहिले— 'फ्रान्सचा प्रतिकार—लढा अभंग रहावा यासाठी मी 'स्वतंत्र फ्रेंच सेना' उभारीत आहे. या कार्यात मला तुझे सहकार्य लाभावे अशी विनंती आहे. तुला जर माझे नेतृत्व मान्य नसेल तर या सेनेचे नेतृत्व दुसऱ्या कोणाकडे सोपवायला माझी तयारी आहे. कारण हा लढा खंडित होता कामा नये एवढीच माझी इच्छा आहे.'

द गॉलचे त्यावेळचे मनोगत स्पष्ट करण्याच्या दृष्टीने हे आवाहन बोलके आहे. आपल्यापेक्षा वयाने मोठे असलेल्या सेनाधिकाऱ्यांनी वैयक्तिक प्रतिष्ठेचा प्रश्न निर्माण करू नये यासाठी प्रतिकार—लढा चालू ठेवणाऱ्या सेनानीचे नेतृत्व मान्य करायची त्याची तयारी होती. मात्र त्याबरोबरच, दुसरा कोणी पुढे येत नसेल तर स्वतःच्या प्रयत्नांवर निर्भर राहण्याची त्याच्या मनाची तयारी झालेली होती.

व्हिशी येथे स्थिरावलेल्या पेताँ सरकारने बावीस जूनला जर्मनीशी शस्त्रसंधी करताच, आपण या सरकारला फ्रान्सचे अधिकृत सरकार मानायला तयार नसल्याचे ब्रिटनने जाहीर केले. जर्मनीबरोबरचे युद्ध अजून संपलेले नाही असे मानणाऱ्या हंगामी फ्रेंच सरकारला आपण मान्या देऊ असेही ब्रिटनने यावेळी काढलेल्या पत्रकात म्हटले होते. ब्रिटनच्या या धोरणाचा आपल्या 'स्वतंत्र फ्रेंच सेने'च्या उभारणीसाठी चांगला फायदा करून घेता येईल हे द गॉलने ओळखले.

ब्रिटन आपल्या पाठीशी उभे रहायला तयार आहे याचा अंदाज येताच द गॉलने उत्तर आफ्रिकेतील फ्रेंच अधिकाऱ्यांना तारा पाठविण्याचा सपाटा आरंभिला. जनरल नोग्युए याने अद्याप त्याच्या पहिल्या पत्राला उत्तर धाडले नव्हते. म्हणून द गॉलने पुन्हा त्याला तार धाडली—'तुझा निर्णय मला लवकर कळवा' सिरिया—लेबॅनॉन येथील फ्रेंच हायकमिशनर पो. इंडोचायनातील गव्हर्नर जनरल कात्रु, टुनिशियातील रेसिडेंट—जनरल पेरूताँ या जागोजाग विखुरलेल्या नागरी आणि लष्करी अधिकाऱ्यांना द गॉल विनवित होता—'आपण सारे एक होऊन फ्रान्स पुन्हा स्वतंत्र करू या. आपण एकत्र झालो तर हे कार्य मुळीच अवघड नाही.'

प्रारंभी, द गॉल याच्या या आवाहनाला कोठूनही प्रतिसाद मिळेना. जो तो व्हिशी सरकार हेच फ्रान्सचे आणि फ्रेंच साम्राज्याचे अधिकृत सरकार आहे असे मानीत होता. सुखवस्तु जीवनाला चटावलेल्या अधिकाऱ्यांच्या दृष्टीने तसे मानणे सोयीचेही होते. एकटचा कात्रु याने द गॉलला आपला होकार कळविला.

वरिष्ठ फ्रेंच अधिकाऱ्यांचे हे औदासीन्य पाहून द गॉल मनोमानसी खिन्न झाला. जो जो प्रयत्न करावा तो तो फसावा असे त्याच्या बाबतीत घडत होते. फ्रान्सने जर्मनीशी शस्त्रसंधी करू नये यासाठी त्याने खूप धडपड केली होती, पण ती सारी निष्फळ ठरली. त्यानंतर फ्रान्सबाहेर 'स्वतंत्र फ्रेंच सरकार' स्थापन करण्याचा त्याने प्रयत्न आरंभिताच उत्तर आफ्रिकेतील फ्रेंच अधिकारी स्वस्थ बसले. डंकर्क येथल्या माघारीनंतर बरीच फ्रेंच पथके ब्रिटनच्या आसऱ्याला आलेली होती. परंतु स्वातंत्र्यलढा कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने हे सेनादल अगदीच तुटपुंजे होते. मायदेशाच्या स्वातंत्र्यासाठी तळमळणाऱ्या नेत्याचा ऊर फाटून जावा अशी ही परिस्थिती होती.

परंतु द गॉल डगमगला नाही.

आपल्या पाठीशी किती लोक उभे आहेत याचा विचार करायला त्याला सवड नव्हती. त्याने स्वतःच्या हिमतीवर 'स्वतंत्र फ्रान्स समिती' स्थापन केली आणि तिला ब्रिटनने मान्यता द्यावी अशी त्याने चर्चिलला विनती केली. अठ्ठावीस जूनला ब्रिटनने या समितीवर आपल्या मान्यतेचे शिक्कामोर्तब करताच द गॉलचा आतापर्यंत कुचंबलेला मार्ग मोकळा झाला. त्याने ब्रिटनमधील फ्रेंच सैनिकांना 'स्वतंत्र फ्रान्स समितीच्या ध्वजाखाली उभे ठाकण्यासंबंधी आवाहन केले. पण येथेही त्याला फारशी साथ मिळाली नाही. कारण त्यातील बरेचसे सैनिक घरी परतायला उत्सुक होते. लढायचा उत्साह त्यांच्यात उरलेला नव्हता. त्यातून ब्रिटिश सरकारही या फ्रेंच सैनिकांना आपल्या देशात ठेवून घ्यायला राजी नव्हते. जर्मन विमानांच्या बाँबहल्ल्यांनी बेजार झालेल्या ब्रिटनला आपल्या स्वतःच्या सैनिकांसाठीच शस्त्रास्त्रांचा तुटवडा जाणवत होता. अशा परिस्थितीत ही आणखी जबाबदारी स्वीकारणे ब्रिटनच्या शक्तीबाहेरचे होते. त्यामुळे जे फ्रेंच सैनिक, द गॉलच्या आवाहनाला साथ देत नव्हते त्यांना ब्रिटिश सरकारने आपल्या जहाजातून उत्तर आफ्रिकेमध्ये धाडून दिले.

ब्रिटनच्या आसऱ्याला आलेल्या फ्रेंच सैनिकांमध्ये ब्रिटनविरोधी भावना निर्माण व्हायला आणखीही एक कारण घडले होते. मेर्स एल केबिर येथील नाविक-तळावरच्या फ्रेंच नौका आपल्या ताब्यात घेण्यासाठी ब्रिटिश नौदलाने त्या तळावर जोरदार हल्ला चढविला होता आणि त्यांत जवळजवळ दीड हजार फ्रेंच सैनिक ठार झाले होते. आपल्या बांधवांवर असा अमानुष हल्ला चढविणाऱ्या ब्रिटनचे बिलकुल ऐकायचे नाही अशी संतापाची भावना फ्रेंच सैनिकांमध्ये निर्माण झाली. अशा मनःस्थितीमध्ये 'द गॉल हा ब्रिटनचा हस्तक आहे' हा व्हिशी नभोवाणीवरून होणारा प्रचार त्यांना खरा वाटला आणि त्यामुळे ते ब्रिटनमधून बाहेर पडले.

जर्मनीविरुद्धच्या युद्धामध्ये फ्रेंच नागरिकांच्या आणि सैनिकांच्या सहानुभूतीची ब्रिटनला मातबरी वाटत असेल तर त्याने 'मेर्स एल केबिर'सारखी आततायी

कृत्ये करता कामानयेत असे द गॉलचेही मत होते. परंतु त्या एका घटनेमुळे फ्रान्सने बिथरून जावे आणि आपल्याला मदत करू इच्छिणाऱ्या ब्रिटनसारख्या मित्र राष्ट्रां-संबंधी अविश्वास दाखवावा हे त्याच्या विवेकबुद्धीला पटण्यासारखे नव्हते. बी. बी. सी. वरून बोलताना तो आपल्या देशबांधवांना आपला खरा शत्रू कोण ते ओळखा असे तळमळून सांगे. बी. बी. सी. वरून भाषण करताना तो म्हणाला होता, 'मेर्स एल केबिर इथं ते काही घडलं ते मला मुळीच मान्य नाही. परंतु त्याचबरोबर आपण हेही ध्यानात घेतले पाहिजे की मेर्स एल केबिर इथल्या फ्रेंच नौका जर्मनीच्या हाती पडू नये यासाठी त्या वेळप्रसंगी तसं करणंच श्रेयस्कर ठरतं. या नौका जर हिटलरच्या हाती पडल्या असत्या तर त्या उद्या अल्जियर्स केसाब्लाका किंवा डाकार इथल्या फ्रेंच नौदलांवर हल्ले करण्यासाठी वापरण्यात आल्या असत्या."

द गॉलचे हे विवेचन, त्याच्या मरगळलेल्या देशबांधवांना पटणे शक्यच नव्हते. केवळ सर्वसामान्य फ्रेंच नागरिक आणि सैनिक सारासार विवेक शक्ती हरवून बसले होते असे नाही. तिसऱ्या प्रजासत्ताकाच्या अखेरच्या काळात हे प्रजासत्ताक वाचविले पाहिजे असा पुकारा करणारे मान्देल हेरिओ यांच्यासारखे नेतेही पेताँने जे केले तेच बरोबर आहे. असे आता मानू लागले होते. हे महायुद्ध आणखी काही काळ चालू राहिले तरी अंतिम विजय हिटलरचाच होणार आहे अशी या नेत्यांनी आपल्या मनाशी खूणगाठ बांधलेली होती. त्यामुळे हिटलरशी लढून फ्रान्सने आपले अधिक नुकसान करून घेऊ नये असे हे परिस्थिती-शरण नेते मानीत होते.

त्यातच फ्रेंच जन मानसाला चकविण्यासाठी हिटलरने योजिलेली युक्तीही सफल ठरली. त्याने अर्धा फ्रान्स नाममात्र का होईना, स्वतंत्र ठेवला होता. विशी येथे स्थापन झालेले पेताँ सरकार फ्रेंच रक्ताचे होते आणि फ्रान्सच्या या नव्या राज-धानीवर फ्रेंच राष्ट्रध्वज फडकत होता. अशा या आपल्याच सरकारविरुद्ध द गॉलने ब्रिटनचे हस्तक होऊन वैर पुकारावे ही गोष्ट फ्रेंच जनमानसाला समजू शकत नव्हती.

पेताँ सरकारचा पाठपुरावा करणाऱ्यांमध्ये दोन भिन्न विचारप्रवाह होते. एक गट स्वतःला अहंमन्य समजत होता. हिटलर आपल्याशी कसा वागतो हे तूर्त पाहू या आणि मगच हिटलरविरोधी भूमिका घ्यायची की नाही हे ठरवू या असा या गटाचा युक्तिवाद होता आणि बऱ्याच जणांना तो व्यवहार्यही वाटत होता. दुसरा गट मात्र हिटलर हाच फ्रान्सचा एकमेव आधार आहे, त्याला राग येईल असे आपण काहीही करता कामा नये असे मानणार होता. महायुद्ध संपले की आपण युरोपची पुनर्घटना करणार आहोत असे हिटलर वेळोवेळी बोलून दाखवीत असे. त्या पुन-र्घटनेमध्ये फ्रान्सला महत्त्वपूर्ण स्थान द्यायला हिटलर अनमान करणार नाही अशी भाबडी समजूत या गटाने आपल्या उराशी जपली होती. आपल्यासंबंधी सद्भाव

बाळगणारा हा गट प्रभावी व्हावा म्हणून हिटलरने मुद्दाम पेतॉं याची भेट घेतली. हिटलर फ्रेंच नेत्यांना बरोबरीच्या नात्याने वागवीत आहे, त्यांचा सल्ला घेत आहे अशी समजूत फ्रेंच नागरिकांमध्ये प्रसृत करण्याच्या दृष्टीने ही भेट कमालीची उपयुक्त ठरली. हिटलरला खूष करण्यासाठी पेतॉं सरकारचा आटापिटा सुरू झाला. पेतॉंने प्रधानमंत्रीपदावरून लाव्हल याला दूर करून त्याच्या जागी अॅडमिरल दार्ला याची नेमणूक केली ती त्यासाठीच. इतर कोणत्याही फ्रेंच नेत्यापेक्षा दार्ला पहिल्यापासून ब्रिटन-द्वेष्टा होता. त्यामुळे प्रधानमंत्रीपदावर आरूढ होताच फ्रान्सने जर्मनीशी लष्करी सहकार्य केले पाहिजे असे तो अट्टाहासाने प्रतिपादन करू लागला.

फ्रान्समध्ये अशी परिस्थिती असताना द गॉल याने लंडनमध्ये 'स्वतंत्र फ्रेंच समिती' स्थापन केली. त्यावेळी त्याच्या पाठीशी अवघे सात हजार फ्रेंच सैनिक उभे राहिले. तेवढ्या बळावरच, द गॉलच्या हालचाली सुरू झाल्या. 'मी म्हणजे फ्रान्स आहे' अशी भाषा तो बोलू लागला. या भाषेला आत्मप्रशंसेचा उग्र दर्प येत असला तरी त्या परिस्थितीत तो एकटाच स्वतंत्र फ्रान्सचा ध्वज आपल्या खांद्यावर घेऊन उभा होता हे नाकारता येत नाही. त्यावेळी लेब्रन रेनॉ, हेरिओ, मान्देल यांच्यासारखे प्रतिष्ठित नेते 'स्वतंत्र फ्रेंच समितीं'मध्ये सहभागी झाले असते तर कदाचित एकट्या द गॉलचे महत्त्व वाढले नसते. या एकाकी अवस्थेनेच द गॉलच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षेला खतपाणी घातले.

द गॉलने 'स्वतंत्र फ्रेंच समिती'ची संस्थापना करताच एकटा पिएर कॉत त्याच्याशी सहकार्य करायला तयार झाला. काही वर्षांपूर्वी कॉत हा विमानतळाचा मंत्री होता. महायुद्धाला प्रारंभ झाला तरीही फ्रेंच विमानदल सुरूच होऊ शकले नाही यास कॉतचे निष्क्रिय धोरणच कारणीभूत आहे अशी त्यावेळी फ्रान्समध्ये टीका झाली होती. असा हा बदनाम माणूस आपण जवळ केला तर आपल्यावरचाही लोकांचा विश्वास उडेल या भीतीने द गॉलने कॉतला दूर ठेवले.

लंडनमध्ये असलेले फ्रेंच अधिकारीही द गॉलच्या खटाटोपाबद्दल उदासीन राहिले. फ्रान्सचा लंडनमधील राजदूत कोर्विन याने पेतॉं सरकारने जर्मनीशी शस्त्रसंधी करताच आपल्या नोकरीचा राजीनामा दिला हे खरे, परंतु द गॉलच्या 'स्वतंत्र फ्रेंच समिती'मध्ये दाखल व्हायला त्याने नकार दिला. 'आपण आता वृद्ध झालो असल्यामुळे आपल्यास ही दगदग सोसणार नाही' असे सांगून तो आपल्या नोकरवर्गासह मायदेशी परतला. रेनॉचा उजवा हात म्हणून ओळखल्या जात असलेल्या रोलान्द द मार्जेरी याची पेतॉं सरकारने शांघाय येथील आपला प्रतिनिधी म्हणून नेमणूक करताच द गॉलने त्यास लंडनला येण्यासंबंधी पत्र धाडले. त्याने द गॉलला कळवले– 'मला माझ्या मनाप्रमाणे फ्रान्सची सेवा करू द्या.' फ्रान्सचा स्वतंत्र लढा परदेशातून चालू ठेवण्याची कल्पना जीन मोनेत यास हास्यास्पद वाटली तर फ्रान्समधील ज्यू नागरिकांच्या जीवितवित्ताचे रक्षण करण्यासाठी आपण फ्रान्समध्येच

राहिले पाहिजे असे रेने मायेर याच्या मनाने घेतले. आन्द्रा मार्वासारख्या स्वातंत्र्य-प्रेमी लेखकाला पराजित फ्रान्समध्ये राहणे मंजूर नव्हते. परंतु त्याचा ब्रिटनवर विश्वास नव्हता. म्हणून तो अमेरिकेला निघून गेला. इतर अनेक नामवंत फ्रेंच साहित्यिक ब्रिटवर जर्मन विमानांची बाँबवृष्टी होत असल्याची सबब सांगून अमेरिकेत रहायला गेले.

त्यामुळे इच्छा नसूनही द गॉलला ब्रिटनच्या मेहेरबानीवर अवलंबून रहाणे भाग पडले. ब्रिटनने ऑगस्टच्या प्रारंभी द गॉल याला कार्ल्टन गार्डन विभागामध्ये 'स्वतंत्र फ्रेंच समिती'च्या कचेरीसाठी जागा दिली. येथे मॉलिशुमन, प्रा. रेने, लापी, पेन्व्हेन, मासिप, बिगेन आदी कार्यकर्ते द गॉलच्या सहकारी-मंडळामध्ये समाविष्ट झाले. द गॉलने या प्रत्येकाकडे आपल्या हंगामी मंत्रीमडळातील एकेक खाते सोपविले. या शिवाय अॅडमिरल म्युसिलिए यांच्याकडे नौदल, मार्गा रिन व्हेनेटर आणि कोनिन यांच्याकडे पायदळ आणि पिजो यांच्याकडे हवाईदल अशी विभागणी करण्यात आली.

या 'स्वतंत्र फ्रेंच समिती'चा कारभार कसा चालावा आणि समितीच्या खर्चाची तरतुद कशी करावी यासंबंधी सात ऑगस्टला चर्चिल आणि द गॉल यांच्यात वाटाघाटी झाल्या. यावेळी असे ठरले की स्वतंत्र फ्रेंच समितीचा सर्वोच्च नेता म्हणून ब्रिटन द गॉलचा मान राखील, परंतु त्याबरोबरच त्याने वेळोवेळी ब्रिटीश सरकारशी विचारविनिमय करूनच आपले धोरण निश्चित करावे. त्याचप्रमाणे स्वतंत्र फ्रेंच समितीला ब्रिटन जी आर्थिक मदत देईल ती कर्ज समजण्यात यावी अशीही या करारात अट घालण्यात आली.

ब्रिटनच्या मार्गदर्शनानुसार आपण काय करावे ही सूचना द गॉल याने अनिच्छेनेच मान्य केली. जोपर्यंत आपण ब्रिटनच्या मेहेरबानीवर उभे आहोत तोपर्यंत आपल्या समितीला स्वतंत्र सरकारची प्रतिष्ठा प्राप्त होणार नाही हे त्याला या करारानंतर विशेषत्वाने जाणवू लागले आणि म्हणून 'स्वतंत्र फ्रेंच समिती'चे कार्यालय उत्तर आफ्रिकेत हलवावे हा विचार त्याच्या मनात बळाव लागला.

हॉलंड, बेल्जम, चेकोस्लोव्हाकिया आणि पोलंड या देशांची निर्वासित सरकारे ब्रिटनच्या मेहेरबानीवर लंडनमध्ये वावरत असली तरी त्या सरकारांमध्ये आणि आपल्या 'स्वतंत्र फ्रेंच समिती'त महत्त्वाचा फरक आहे हे द गॉलला ठाऊक होते. या देशांमध्ये जर्मन सेना घुसतात तेथील सरकारांनी आपापल्या देशातून पळ काढला आणि आम्ही पराभूत झालो असलो तरी शरण आलेले नाही हे दाखविण्यासाठी ब्रिटनमध्ये मुक्काम केला. त्यामुळे या देशांची साम्राज्ये लंडनमधील निर्वासित सरकारानाच आपली अधिकृत शासनसंस्था मानीत होते. लंडनला कचेरी थाटलेले सरकार कांगोवर धिकार गाजवीत होते. तीच गोष्ट हॉलंडची. आग्नेय अशियातील इंडोनेशिया अद्यापही लंडन-स्थित डच सरकारचे आदेश पाळत होता. पोलंड,

चेकोस्लोव्हाकिया आणि नॉर्वे या देशांची हॉलंड, बेल्जीयमप्रमाणे अन्यत्र साम्राज्ये नसली तरी त्या प्रत्येकाचे स्वातंत्र सेनादल होते.

द गॉलची अवस्था अगदी वेगळी होती.

व्हिशी येथल्या पेताँ सरकारला ब्रिटनने मान्यता दिलेली नसली तरी फ्रेंच भूमीवर त्या सरकारचीच अधिसत्ता होती आणि अमेरिका, रशिया, कॅनडा आदी राष्ट्रांनी तर आपले राजदूत व्हिशी येथून काढून घेतले नव्हते. व्हिशी सरकारला कायदेशीर प्रतिष्ठा नाही असे द गॉल सांगत असला तरी तेवढे म्हणणे पुरेसे नव्हते. त्यामुळे आपल्या हंगामी फ्रेंच सरकारला हॉलंड, बेल्जम आदी राष्ट्रांसारखी निर्वासित सरकारची प्रतिष्ठा लाभणार नाही ही वस्तुस्थिती द गॉल विसरू म्हटले तरी विसरू शकत नव्हता. ' नाझी जर्मनीचे आक्रमण परतविण्यासाठी फ्रान्समध्ये प्रतिकार-वृत्तीची ज्वाला धगधगत आहे ' असे द गॉल बी. बी. सी. वरून ओरडून सांगत असला तरी फ्रान्समध्ये ज्वालाही उरलेली नव्हती आणि धगही जाणवत नव्हती.

' फ्रान्सला झालं आहे तरी काय ' असे तो मित्रमंडळींच्या बैठकीमध्ये संतापून म्हणे. सत्तेमध्ये सहभाग मिळालेल्या लाचारांनी व्हिशी सरकारचा जयजयकार करावा हे स्वाभाविक होते; परंतु साऱ्या देशाने, ही शरणागत शासनसंस्था आपली मानवी ही गोष्ट द गॉलच्या पुपुत्सु मनाला समजू शकत नव्हती. फ्रान्सच्या पाठोपाठ ब्रिटनलाही शरणागती स्वीकारावी लागणार आहे असे फ्रेंच माणूस धरून चालला होता. तसे वाटावे अशी त्यावेळी परिस्थिती निर्माणही झालेली होती. फ्रान्सच्या काहीशा आकस्मिक शरणागतीनंतर हिटलरची बेभान नजर खाडी-पलिकडच्या ब्रिटनच्या दिशेने भिरभिरत होती आणि म्हणून त्याने अहोरात्र ब्रिटनवर बाँबहल्ले करून त्याला जेरबंद करण्याचा उद्योग आरंभिला होता. परंतु ब्रिटनला लाभलेल्या नेतृत्वाचे रसायन, तत्कालिन फ्रेंच नेतृत्वापेक्षा सर्वथैव वेगळ होते. जो जो हिटलरची अग्निवृष्टी नवनवा संहार करू लागली तो तो हे चिमुकले बेट अखेरपर्यंत झुंजविण्याचा चर्चिलचा निर्धार अधिक कणखर होत होता. युद्ध-कालिन नेतृत्वाचा एक नवा आदर्श चर्चिलच्या रूपाने ब्रिटनला पहायला मिळत होता.

तसे नेतृत्व आपण फ्रान्सला देऊ शकू असा द गॉलला सार्थ विश्वास वाटत होता. परंतु फ्रान्सला त्या नेतृत्वाची ओळख पटली नाही, महती जाणवली नाही. राष्ट्र पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळते ते अशा भ्रांत मनोवृत्तीमुळे.

ब्रिटनचा आसरा सोडून, उत्तर आफ्रिकेतील आपल्या साम्राज्यांतर्गत देशामध्ये गेल्याशिवाय आता आपल्याला पर्याय उरलेला नाही याची खात्री द गॉलला प्रति-दिनी पटत होती. त्यासाठी धाडसी पावले टाकायचीही त्याच्या मनाची तयारी झाली होती.

उत्तर आफ्रिकेमध्ये फ्रान्सचे साम्राज्य अजस्त्र पसरले होते हे खरे असले तरी अल्जेरिया, मोरोक्को आणि ट्युनिशिया हे महाकाय देश, पेतॉंच्या शस्त्रसंधीमुळे त्याच्यावर खूष होते. युद्ध आपल्यापर्यंत येऊन पोचत नाही याबद्दल त्यांची खात्री पटलेली होती. हे तीन इस्लामी देश पेतॉंशी एकनिष्ठ रहायला आणखी एक कारण होते. ज्यूंचा निःपात करण्यासाठी वचनबद्ध झालेल्या हिटलरशी पेतॉं सरकारने संगनमत केल्यामुळे या देशातील इस्लामी आणि ख्रिश्चन जनमत पेतॉंच्या बाजूने झुकले होते. त्यामुळे द गॉलला तेथे पायारोवा करता येणे शक्य नव्हते.

म्हणून त्याने आपले लक्ष निग्रो लोकांची वस्ती असलेल्या देशांकडे वळविले. एक, तर, इस्लामी देशात पिढयान् पिढया वास्तव्य करणाऱ्या आणि सुखासीन जीवन जगणाऱ्या फ्रेंच धनिकांच्या मानाने या आफ्रिकी देशांमध्ये वसाहतीसाठी गेलेले फ्रेंच नागरिक तरुण होते, अद्याप नीट बस्तान बसलेले नसल्यामुळे काही-तरी नवे करून दाखविण्याची इर्षा त्यांच्या मनात वावरत होती. हिटलरपुढे लोटांगण घालून पेतॉं सरकारने फ्रान्सची प्रतिष्ठा घालविली आहे याची बोच त्यांना सलत होती. या देशांपैकी कामेरून हा तर पहिल्या महायुद्धापूर्वी जर्मनीच्या ताब्यात होता आणि तेथे पुन्हा आपले वर्चस्व प्रस्थापित झाले पाहिजे यासाठी हिटलर आज ना उद्या धडपडणार याबद्दल येथल्या आफ्रिकी नागरिकांना मुळीच शंका नव्हती. कामेरूनलगतच्या देशांनाही ही भीती भेडसावत होती. द गॉलच्या 'स्वतंत्र फ्रेंच समिती'शी आपण सहकार्य केले पाहिजे असे छाडचा नीग्रो गव्हर्नर फेलिक्स एबो याला वाटले ते त्यामुळे. एबोने द. गॉलचा पुरस्कार आरंभिताच डाकार, अबिजान, कोना की, दौआला, ब्राझाव्हिल आदी आफ्रिकी शहरांमध्ये द गॉलला पाठिंबा व्यक्त करणारी निदर्शने होऊ लागली.

द गॉलला हवे असलेले वातावरण हळूहळू निर्माण होत होते.

त्याने तेवीस ऑगस्टला आपला अर्थमंत्री प्लीव्हन याला छाडची राजधानी फोर्ट लामी येथे धाडले. प्लीव्हन आणि एबो यांच्यात दोन-तीन दिवस वाटाघाटी झाल्यानंतर सव्वीस ऑगस्टला एबोने जाहीर केले – स्वतंत्र फ्रेंच समितीचा एक घटक या नात्याने छाड या युद्धात उभा ठाकणार आहे ' यानंतर द गॉलने आपल्या इतर अधिकाऱ्यांना इतर आफ्रिकी देशांमध्ये धाडायला प्रारंभ केला. कर्नल लेक्लेर्क कामेरूनची राजधानी दौआला येथे जाऊन थडकला आणि तेथे त्याने स्वतंत्र फ्रेंच समितीच्या अधिसत्तेचा पुकारा केला. कर्नल कार्मिनात याने ब्राझाव्हिलमध्ये प्रवेश करून द गॉलच्या नेतृत्वाची द्वाही फिरविली. हिटलरचे सैन्य कामेरूनमध्ये घुसले तर नायजेरिया आणि गोल्ड कोस्ट या आपल्या साम्राज्यातील देशांना धोका निर्माण होईल हे ओळखून चर्चिलने द गॉलच्या या उपक्रमाला आपला पाठिंबा असल्याचे जाहीर केले.

यातूनच 'डाकार-मोहिमे 'चा जन्म झाला.

आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील डाकार हे बंदर नाविक लढाईच्या दृष्टीने विशेष महत्वाचे होते. एक तर तेथला नाविक तळ अद्ययावत होता. शिवाय अमेरिकेच्या सर्वांत जवळचे असे तेच आफ्रिकी बंदर होते. त्यामुळे अॅटलांटिक महासागरावर जर्मन नौदलाशी युद्ध खेळताना डाकार द गॉलच्या ताब्यात येणे ब्रिटनच्या दृष्टीने आवश्यक ठरत होते. डाकारचे हे महत्त्व ओळखून हिटलर पेतॉं सरकारकडे आपल्या पाणबुड्या तेथे ठेवायला परवानगी मागेल आणि पेतॉं सरकारने तशी परवानगी दिली की पश्चिम आफ्रिकेचा संपूर्ण किनारा आपल्या जहाजांच्या वाहतुकीला धोक्याचा ठरेल याचीही ब्रिटनला भीती वाटत होती.

द गॉलच्या दृष्टीने डाकारला राजकीय महत्त्व होते. एकदा का डाकारसारखे महत्त्वाचे बंदर आपल्या ताब्यात आले की मोरोक्को, ट्युनिशिया आणि अल्जेरिया यांना आपल्याविरुद्ध जाता येणार नाही हे त्याला माहीत होते. डाकार येथील गव्हर्नर बोईसाँ हा पेतॉं राजवटीचा निष्ठावंत सेवक असला तरी तेथील फ्रेंच सेनानी जनरल नोग्युए याला पेतॉं सरकारने जर्मनीशी केलेला शस्त्रसंधी फारसा रुचलेला नव्हता. असे असले तरी डाकार जिंकणे सोपे नव्हते. कारण प्रारंभापासूनच फ्रेंच सरकारचे बरेचसे नौदल या बंदरात एकवटलेले होते. शिवाय भूमध्य समुद्रातील ब्रिटिश जहाजांना हुलकावणी देऊन निघालेली फ्रेंच जहाजे डाकार येथे येऊन दाखल झाली होती.

डाकारवर आपण सरळ हल्ला चढविला तर आपण हमखास मार खाऊ हे ओळखून आपले सैन्य कोनाक्री येथे उतरविण्याचे द गॉलने ठरविले. फारसा बंदोबस्त नसलेले कोनाक्री आपल्या ताब्यात आले, की ब्रिटिश नौदलाच्या साह्याने डाकारपर्यंत पोचावे आणि मग चढाईला प्रारंभ करावा असा द गॉल याचा मूळचा बेत होता. परंतु चर्चिलने या योजनेला विरोध केला. जर्मनीचे ब्रिटनविरुद्धचे हवाई युद्ध ऐन जोरात सुरू असताना आपण आपले नौदल आफ्रिकेकडे पाठवू शकत नाही असे त्याने द गॉलला कळविले.

त्यामुळे आपल्या अपुऱ्या साधनसामग्रीनिशी 'डाकार–मोहीम' हाती घेणे द गॉलला भाग पडले.

द गॉलच्या नौ-सैनिकांनी डाकार येथे उतरण्याचा तेवीस सप्टेंबरला पहिला प्रयत्न केला. पण तो फसला. द गॉलचे आघाडीचे नौ-सैनिक पेतॉं सरकारचे कैदी झाले. दुसऱ्या दिवशी द गॉलच्या उर्वरित नौसैनिकांनी डाकारपासून थोडेसे दूर असलेल्या रफिस्क येथे उतरण्याचा प्रयत्न केला. त्यालाही यश आले नाही. त्यामुळे पचवीस सप्टेंबरला द गॉल अॅडमिरल कनिंगहॅम याला म्हणाला, "डाकारवर हल्ला चढवून काहीही साध्य होत नाही हे आता स्पष्ट झालेलं आहे. म्हणून आपण डाकार ताब्यात घेण्याचा नाद सोडून देऊन डाकारची नाकेबंदी करण्याचा पवित्रा

घ्यावा. एकदा का डाकारची नाकेबंदी झाली की डाकारपासून दीडशे मैलांवर असलेल्या सेंट लुई इथं आपल्याला सैन्य उतरवता येईल."

द गॉलचा हा युद्धव्यूह कनिगहॅमला मान्य झाला. परंतु एवढ्यात त्याला चर्चिल-कडून हुकूम आला–'द गॉलच्या नव्या योजनेत काहीही अर्थ नाही. तू सरळ डाकारवर हल्ला चढविणेच इष्ट ठरेल.' त्याप्रमाणे सव्वीस सप्टेंबरला दिवसभर कनिगहॅमच्या नौका डाकार बंदरामध्ये उभ्या असलेल्या फ्रेंच नौकांवर तोफ-गोळ्यांचा मारा करीत होत्या. परंतु डाकार येथील फ्रेंच नौदल, कनिगहॅमच्या दिमतीला असलेल्या नाविक सामर्थ्याच्या तुलनेने कितीतरी बलिष्ठ होते. त्यामुळे कनिगहॅमला माघार घ्यावी लागली.

डाकार–मोहीम पूर्णपणे फसली. त्यामुळे पेताँ सरकारच्या ताब्यात असलेला पश्चिम आणि उत्तर आफ्रिकेतील प्रदेश आपल्या नियंत्रणक्षेत्राखाली आणण्याचा द गॉलचा बेत वाया गेला. अपयशाचा धनी झालेल्या द गॉलबद्दल सहानुभूती दाखविण्याऐवजी चर्चिल आणि रूझवेल्ट यांनी त्याला दूषणे द्यायला सुरुवात केली.

अपयशाचा हा कडू घोट द गॉलने त्यावेळी शांतपणे पचविला, पण तेव्हापासून त्याच्या मनात अमेरिका आणि ब्रिटन यांच्यासंबंधी सूक्ष्म दुस्वास निर्माण झाला. त्याच्या दुखऱ्या मनाने त्या वेळी ते बोलून दाखविले नाही; परंतु संधी मिळेल तेव्हा या अहंमन्य वर्तनाचा बदला घ्यायचा आहे हे त्याने आपल्या मनाशी पक्के केले होते.

आठ ऑक्टोबरला द गॉल स्वतः दौआस येथे गेला. तेथून तो ब्राझव्हिल येथे गेला. या दोन्ही ठिकाणी त्याने 'स्वतंत्र फ्रेंच समिती'च्या कचेऱ्या उभारल्या. आफ्रिकेत पायरावा करण्याच्या त्याच्या कार्याचा हा प्रारंभ होता. उत्तर आफ्रिका त्याच्या हातात आली नव्हती. पण मध्य आफ्रिकेमध्ये त्याला आता घट्ट पाय रोवून उभे राहणे शक्य होणार होते.

आफ्रिकेतील ही महत्त्वपूर्ण कामगिरी आटोपून द गॉल सतरा नोव्हेंबरला लंडनला परतला.

या वेळी जर्मनीचे ब्रिटनविरुद्धचे हवाई-युद्ध भराला आलेले होते. त्यामुळे द गॉलच्या आगमनाची ब्रिटनने फारशी दखल घेतली नाही.

आपल्यासंबंधीचे ब्रिटनचे हे औदासिन्य द गॉलच्या मानी स्वभावाला रुचण्या-सारखे नव्हते.

(क्रमशः)

## दोन अखिल भारतीय कबड्डी स्पर्धा

# मराठा लान्सर आणि सुभाषमंडळ नागपूर

कबड्डीला देशी खेळांचा राजा समजण्यात येते. इतर महाराजांचे नसले तरी या राजाचे ग्रहमान सध्या जोरात आहेत. दजदार कबड्डीस्पर्धा भरविण्याची एक निकोप स्पर्धाच जणू सध्या महाराष्ट्रात चालू आहे आणि पुण्या-मुंबईकरांच्या तोडीला तोड ठरून विदर्भ सध्या या बाबतीत ' फॉर्मात ' आहे.

एवढयाशा विदर्भात सुमारे अकरा अखिल भारतीय स्वरूपाच्या कबड्डी स्पर्धा होतात. त्यापैकी नागपूर, हिंगणघाट, दिग्रस, चंद्रपूर येथील संयोजक आपले अखिल भारतीय सामने खरेखुरे तसे ठरावेत यासाठी अहिमहिकेने प्रयत्न करतात. भारता-मधील निरनिराळया राज्यातून बोलाविलेले कबड्डीचे संघ, त्यांच्या येण्याजाण्याच्या आणि रहाण्याजेवण्याच्या खर्चाची विनामूल्य पण उत्कृष्ट व्यवस्था, सुवर्णपदके, चांदीचे पदक आणि रोख बक्षिसे यांची लयलूट आणि ' दाद ' देणारा प्रेक्षकवर्ग, हे सारे खेळाडूला खासच आकर्षित करणारे असते.

नागपुरात नुकत्याच लागोपाठ पार पडलेल्या अशा दोन स्पर्धा मला खेळावयास आणि पहावयास मिळाल्या. मराठा लान्सर आणि सुभाषमंडळ नागपूर या संस्थांनी त्या आयोजित केल्या होत्या. जानेवारी १५ ते १८ आणि २१ ते २४.

महाराष्ट्रातल्या निवडक संघाबरोबरच तामीळनाडू, मध्यप्रदेश, म्हैसूर, राजस्थान, ओरिसा, इत्यादी राज्यातले संघ या मैदानावर उतरले. महिलांच्याही आठ निवडक चमूंनी या स्पर्धा गाजविल्या. मराठा लान्सरतर्फे झालेल्या सामन्यात विभागीय (Zonal) सामने विशेष रंगले नाहीत पण बाद पद्धतीच्या सामन्यात खूप बहार-दार खेळ बघावयास मिळाला. सातारा आणि दिग्रस, पी. एम. टी. पुणे आणि हिंदसायकल मुंबई हे असे सामने. पुण्याच्या बाळ कोंढाळकरच्या तडाखेबंद चढा-यांनी हिंदसायकलवर लावलेले लोण आणि मिळवलेली आघाडी पुणेकर सांभाळू शकले नाहीत. निदान रेषा बंद करण्याचा आणि शेखर शेट्टीच्या वेगवान चढायाचा

खेळ करून हिंद सायकलने आर्वांडो मिळवली आणि ती टिकवली. (बाळ कोंढाळकरसारखा अनेक वर्षे राष्ट्रीय स्पर्धा गाजविणारा खेळाडू अधिक विचारपूर्वक आणि धोरणाने खेळ करेल तर त्याच्या संघाला तो अनेक अजिंक्यपदे सहज मिळवून देईल.) उपांत्य फेरीत भोपाळकरांनी दिग्रसच्या संघाचे कच्चे दुवे हुडकून त्यांचा पद्धतशीरपणे पराभव केला. अंतिम सामना मात्र एकतर्फीच झाला. पहिल्यापासून आक्रमक पवित्रा स्वीकारून हिंदसायकलने पहिल्याच डावात एवढी आघाडी मिळविली की भोपळकरांना त्याच्या जवळपास जाणे अशक्य व्हावे. सामन्यातल्या उत्कृष्ट चढाईचे पारितोषक मुंबईच्या शेखर शेट्टीला मिळाले. आपल्या उंचीचा एवढ्या सुयोग्यपणे उपयोग करून वेगवान आणि कौशल्यपूर्ण चढाई करणाऱ्या भारतातील प्रमुख खेळाडूत शेखरचे नाव घेतले जाते ते सार्थ ठरावे असा त्याचा खेळ झाला खरा !

महिला संघातील अनपेक्षित निकालाने सर्वांनाच धक्का दिला. उपांत्य फेरीत तामीळनाडू संघाने मुंबईच्या नवयुग संघाला हरविले. प्रतिस्पर्धी संघ केव्हाही हलका लेखू नये हा धडा मुंबईकर भगिनी या सामन्यापासून निश्चितच शिकतील. दुसरा उपांत्य सामना मात्र दोन नागपूरच्या संघातच झाला आणि युवकक्रीडा संघ विजयी ठरला. फारशी योग्यता नसताना बचावात्मक खेळ आणि जोरदार नशिब याच्या साहाय्यानेच अंतिम फेरीपर्यंत वाटचाल केलेल्या तामीळनाडू संघाला युवक क्रीडाकडून पत्करावा लागलेला पराभव स्वतःच्या संघाचे नेमके निदान करावयास उपयोगी पडला असेल अशी आशा आहे.

सुभाषमंडळाचे विभागीय सामन्यापासूनच अटीतटीच्या झुंजी झाल्या. 'ए' गटातील प्रेसिडेंट क्लब बंगलोर, ज्योतिमंडळ वर्धा यांना विभागीय विजेते उपविजेतेपद मिळाले खरे पण या विभागात पराभूत ठरलेला अमरावतीचा संघही वरील दोघांना तोडीला तोड होता. बिचारे अवघे दोन गुणांनी हार खाऊन विभागातून बाद झाले. ब विभागातून राणाप्रताप, पुणे आणि नवरंग मंडळ, दिग्रस वर आले. या दोन संघाचा सामना आणि या दोन्ही संघाचा अकोल्याच्या संघाबरोबर झालेली लढत ही कबड्डीरसिकांना खेळाची मेजवानी देणारी ठरली. क विभागात अलाहाबाद, रुरकेला इत्यादी संघांना सहजपणे पराभूत करणाऱ्या साताऱ्च्या श्री. शिवाजी उदय मंडळाला हिंगणघाटच्या सुभाष मंडळाने जोरात झुंजविले. अवघ्या एक गुणाने विजयी ठरून सातारकर विभागीय विजेते ठरले. ड विभागात मुंबईच्या दुर्गामाता संघाने मात्र सर्वांना सरळ सरळ चितपट केले.

बचावात्मक कबड्डीचे नगारे सगळीकडे वाजत असताना बाद पद्धतीच्या सामन्यात नागपूरकरांना मात्र श्वास रोखावयास लावणारा खेळ पहावयास मिळाला. शिवाजी उदय मंडळाचे ज्योतीमंडळ; वर्धा आणि प्रेसिडेंट क्लब बंगलोर याबरोबर झालेले सामने आणि बंगलोर आणि हिंगणघाटचे सामने हे जादा वेळ देऊन खेळा-

वयास लागले आणि त्या सर्व पन्नास मिनिटे खेळाची अनिश्चितता आणि विजयश्री खेचावयास दोन्ही संघाची चाललेली धडपड यामध्ये खऱ्याखुऱ्या कबड्डीचे कौशल्य प्रेक्षकांना बघावयास मिळाले.

दिग्रसच्या नगरपरिषदेने उपांत्यपूर्व फेरीत मुंबईकरांना पराभूत करून सर्वांनाच धक्का दिला. पण ही तर कुठे सुरुवात होती. विभागीय सामन्यात त्यांच्यावर मात करणाऱ्या राणाप्रताप संघाला त्यांनी बाद उपांत्य फेरीत पराभूत करून अंतिमफेरी गाठली. अंतिमफेरीत त्यांचा आणि शिवाजी उदय मंडळ सातारामधील सामना खूपच रंगला. साताऱ्च्या भाग्यवंत अहिरे, गोपाळ माने यांनी केलेले चढाईचे भगीरथ प्रयत्न आधीच्या सामन्याप्रमाणे पराभवाचे विजयात रूपांतर करू शकले नाहीत. दिग्रसचा संघ होता किरकोळ शरीरयष्टिचाच. पण सुरेख क्षेत्ररक्षण आणि रामू पवारचे सुयोग्य नेतृत्व याच्या बळावर त्यांनी हे अखिल भारतीय अजिंक्यपद प्राप्त करून घेतले.

विभागीय सामने सहजपणे जिंकून अंतिमफेरीपर्यंत वाटचाल केलेल्या मुंबईच्या जॅफ्रेमॅनर्स आणि पुण्याच्या राणाप्रताप या संघातील लढत रंगणार नाही असे पहिल्या दहा मिनिटात वाटत होते. सामना शून्य गुणावर संथपणे चालला होता. जयश्री कदमने एकाच चढाईत चार गडी बाद करून मुंबईला एकदम आघाडी

---

मराठा लान्सर या संस्थेच्या सामन्याच्या बक्षिससमारंभाच्या वेळी वेदप्रकाश आणि त्याचे वस्ताद उपस्थित होते. अवघ्या चौदाव्यावर्षी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक मिळवणाऱ्या या वंडर बॉयचे खूपच हार्दिक स्वागत आणि कौतुक झाले.

सुभाष मंडळाने सामन्याच्या उद्घाटन प्रसंगी त्यांचे पश्चिम जर्मनीत जाऊन आलेले खेळाडू श्री. भट यांचा बेताचा मल्लखांब सादर केला. मल्लखांबातले शिवछत्रपती पारितोषक यंदा त्यांना मिळाले तर एका तरुणाच्या कर्तृत्वाचा योग्य सन्मान झाल्याचे समाधान लाभेल.

अमरावतीच्या हनुमान मंडळाचे दहा खेळाडू कबड्डीमधील दुखापती या विषयाचा शास्त्रीय अभ्यास करावयास या सामन्याला आले होते. त्यांनी त्याचा एक मोठा फॉर्म तयार केला होता व तो ते सर्व खेळाडूंच्याकडून भरून घेत. त्यांनी छोट्या मोठ्या दुखापतीचे फोटोही घेतले. सुमारे वर्षभर निरनिराळ्या सामन्यातून ही माहिती गोळा करून नेत्यांना अहवाल सादर करतील. देशी खेळांच्याबाबत हा पहिलाच या स्वरूपाचा प्रयत्न होत आहे त्यांचे संचलनही खूपच नेटके आहे.

---

मिळवून दिली. बैठक मारून खालच्या पायाने गडीबाद करण्याचे तिचे कौशल्य हे पुरुष खेळाडूंनी कित्ता गिरवावा इतके 'खास' होते. मिळवलेली ही आघाडी सांभाळताना मात्र मुंबईकरांना त्रासाचे गेले. पुण्याच्या जयश्री झेंडे आणि रंजना गुप्तेने सामना आपल्या बाजूने फिरवण्याचा धडाडीचा प्रयत्न केला पण निर्णायक यश मिळवण्याइतके यश त्यांच्या प्रयत्नांना लाभू शकले नाही.

सामन्याचे उद्घाटन आणि बक्षिस समारंभ या दोन्ही प्रसंगी महाराष्ट्राचे अर्थ व क्रिडा मंत्री मा. शेषरावजी वानखेडे उपस्थित होते. घरगुती जिव्हाळयाने (उद्योगपती असलेल्या प्रमुख पाहूण्यांची देणगी हजारावरून पाच हजारापर्यंत वाढविण्यास त्यांचा चांगलाच उपयोग संस्थेला झाला.)

खेळाची ज्ञात आणि मात आणि खेळाडूंना खेळण्याचा मनमुराद आनंद देण्यासाठी तर सामन्याचा फायदा झालाच पण बंगलोर, भिलाई, जोधपूर, रुरकेला अशा लांब लांबच्या कबड्डीच्या मोहिमांची प्रेमपूर्वक आमंत्रणे साऱ्या भारतभर पोचली आणि दूरवरच्या स्वाऱ्यांची स्वप्ने कबड्डीचे मावळे बघू लागले हेही खूप मोलाचे. ज्या ज्या वेळी ह्या मुलुखगिरीच्या स्वाऱ्या होतील त्या त्या वेळी वाचकांना त्याचा वृत्तांत पेश होईलच.

## आता यांना हाकलले पाहिजे

राष्ट्रीय खेळ म्हणून ज्या कबड्डीची टिमकी वाजवितात त्या कबड्डीच्या अखिल भारतीय असोसिएशनचा कारभार अत्यंत असमाधानकारक आणि गलथान आहे असेच म्हणावे लागते. या सगळयामागचे सूत्रधार म्हणून या असोशिसेशनचे अध्यक्ष श्री. त्रिपाठी (अहलहाबाद) यांना जबाबदार धरावे लागेल.

खरे म्हटले तर अखिल भारतीय स्वरूपाच्या दोन क्रीडासंघटनाचे अध्यक्षपद एकाच माणसाकडे राहू नये हा नियम. पण तो धाब्यावर बसवून हे महाशय व्हॉलीबॉल आणि कबड्डी या संघटनांचे अध्यक्षपद गेले कित्येक वर्षे भोगत आहेत. सर्वप्रकारच्या मार्गाचा अवलंब करून, या ना त्या कारणाने गेली सहा वर्षे अ. भा. क. असोसिएशनच्या निवडणुकाचमुळी त्यांनी घेतलेल्या नाहीत. चार राज्यातील चार बगलबच्चे ताब्यात ठेवून खुर्ची सांभाळण्याच्या या उद्योगात कबड्डीच्या विकासाची फिकीर आहे कुणाला? ज्या उत्तर प्रदेशातील अध्यक्ष आहेत त्या उत्तर प्रदेशात हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या देखील जिल्हा कबड्डी संघटनाची स्थापना नसावी आणि एकही मोठी स्पर्धा भरू नये हे कशाचे लक्षण? स्वतः स्पर्धा आयोजित करणे दूर राहिले पण इतरांनी ज्या अखिल भारतीय स्पर्धा आयोजित केल्या, त्यासाठी पाठविलेल्या शंभर रुपये प्रवेश फीची पावतीही मिळू नये हे कोणत्या कार्यक्षमतेत बसते? अनेक वेळा सूचना करूनही पतियाळाच्या

A. I. N. I. च्या संस्थेला कबड्डीचे Syllabus सादर केले जाऊ नये, मग कबड्डीचा पद्धतशीर विकास होणार कसा? प्रांतवार कबड्डी संघटनेचे काम सजविणे, अविकसित भागाचे दौरे आयोजित करणे, आंतरराज्यीय प्रचारासाठी एखादे बुलेटीन वर्षातून एकदा दोनदा प्रकाशित करणे, अथवा आंतरराष्ट्रीय मैदानावर कबड्डीची पताका फडकवणे या साऱ्या गोष्टी तर मग खूपच दूर राहिल्या.

महाराष्ट्रामध्ये कबड्डी असोसिसेशनचे काम सजले आहे. इथला खेळ आणि खेळाडू अनेक दृष्टिने सुखात आहे, पण ज्या खेळाला राष्ट्रीय म्हणावयाचे त्या खेळाचा विकास आणि प्रसार साऱ्या भारतवर्षात व्हावयास हव्या. निरनिराळ्या राज्यातील शासनाचा आणि जनतेचा कल लक्षात घेता हे शक्य आहे पण अखिल भारतीय कबड्डी असोशिएशनच्या खुर्च्या मर्यादित स्वार्थासाठी जोपर्यंत त्रिपाठी आणि कंपनीने अडविल्या आहेत तोपर्यंत हे परिवर्तन घडावे कसे? बदलाची सुरुवात ही अ. भा. क. अ. ची कार्यकारणी बदलून करावी लागेल.






फेब्रुवारीच्या १० ते १४ तारखेपर्यंत दिल्लीला जे अखिल भारतीय आंतरराज्य कबड्डी सामने होणार आहेत त्यावेळी महाराष्ट्र, दिल्ली, हैद्राबाद, आंध्र, मद्रास येथील कार्यकर्ते Vote of non confidence च्या मार्गाने त्रिपाठींना पदच्युत करून दिल्लीचे महापौर मल्होत्रा यांना हे पद विभूषित करण्याची विनंती करणार आहेत असे समजते.

कबड्डीच्या प्रसाराची झालेली कोंडी फुटण्यासाठी ही दिल्लीवरची स्वारी यशस्वी होणे आवश्यक आहे.

□ □ □

# धनंजय कीर

यांनी महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनप्रसंगी केलेल्या भाषणाचा गोषवारा–२३।१२।१९७०

आपल्या महाविद्यालयाच्या आमंत्रणाचा मी स्वीकार केला तो विशेष हेतूने. या गावात मोठा इतिहास घडला. सामाजिक विषमतेविरुद्ध, अन्यायाविरुद्ध आवाज उठला. त्याचे नेतृत्व बाबासाहेबांकडे होते. आजही त्या लढ्याची चित्रे नजरेसमोर तरळतात. त्यात प्रत्यक्ष भाग घेणारे सुरबा टिपणीसांसारखे लोक येथे आहेत. ते तुम्हाला त्या लढ्याची चित्तथरारक हकीकत सांगतील. हा लढा मानवाच्या इतिहासातील सोनेरी पान आहे. आणि समतेचा इतिहास लिहीला गेला तर त्यात महाडचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल.

समतेच्या घोषणा आपण प्राचीन काळापासून करीत आहोत. उपनिषदात समता आहे. गीतेत आहे. अगदी शंकराचार्यांनीसुद्धा सर्वत्र ब्रह्म आहे असे म्हटले आहे. पण ही उच्चारातली समता कधी आचारात आली नाही. आचरणात समता हवी. महाराष्ट्रात तसा प्रयत्न महानुभावांनी केला. पण ते फारसे लोकप्रिय झाले नाहीत. तरीही एका क्रांतीची सुरुवात त्यांनी केली. परंतु त्याच वेळी ज्ञानेश्वरांनी पुन्हा चातुर्वर्ण्य सावरले. वेदांची पुन:स्थापना केली. वर्णाश्रमाचे तत्त्व मांडले. ज्ञानेश्वर महान योगी, तपस्वी, त्यागी. स्वत: नाथपंथी. पण तरीही ब्राह्मणांची त्यांनी भरपूर स्तुती केली. त्यामुळे समतेच्या क्रांतीला आळा बसला. तो क्रांतीचा अंगारा पुढे बाबासाहेबांनी धगधगीत पेटवला. तडजोडीला त्यांची तयारी नव्हती. गांधींना त्यांनी सांगितले, 'त्या त्या वर्णाच्या माणसांनी ती तीच कर्मे करण्याचे कारण काय ? जर वर्णाश्रम तुम्हाला हवा असेल तर मी तुमच्यात येत नाही.' गांधीजी तडजोड करू पाहत. ते जाती मानीत. फक्त अस्पृश्यता पाळीत नसत. म्हणजे मूळ उच्चनीचता तशीच राही. विषमतेलाच बाबासाहेबांचा विरोध होता. म्हणून ते वेगळ्या मार्गाने गेले. समतेचा झगडा त्यांनी प्रखर केला. येथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी ही स्फूर्ती घ्यावी.'मनुष्य तो समान. सर्व धर्म समान.

समतेच्या आचरणाचा लोकशाही हा प्रभावी मार्ग आहे. लोकशाहीने मानवी हक्कांचे संरक्षण होते. म्हणून बाबासाहेबांनी तिचा पुरस्कार केला. आज लोकशाही नुसती नावाला आहे. पार्लमेंट म्हणजे लोकशाही नव्हे. पार्लमेंट लोकशाहीचे साधन आहे. खरी लोकशाही प्रत्येकाच्या विचारांत, डोक्यात हवी. माणूस हा समान आहे हा तो विचार. समता हे लोकशाहीचे खरे मूल्य. तेच ज्योतिबांनी शंभर वर्षांमागे सांगितले. त्याचाच पुरस्कार बाबासाहेबांनी केला. ही लोकशाही राबवावयाची तर शक्ती पाहिजे. ती शक्ती मिळविण्यासाठी बाबासाहेबांनी तपश्चर्या केली. अखंड तपश्चर्या, परिश्रम ही अस्सल देशभक्तीची कसोटी. तुरुंगात गेला म्हणून देशभक्त होत नाही. देशभक्त कोण? रात्रंदिवस समाजकल्याणाचाच विचार करतो तो खरा देशभक्त. त्यागाने तपश्चर्या करतो तो तेजस्वी. या महाराष्ट्रात बाबासाहेबांनी जे कर्तृत्व गाजविले व त्यासाठी जे परिश्रम केले ते लो. टिळक, गोखले, रानडे यांच्याइतके किंबहुना अधिकच होत. कारण बाबासाहेबांचा फार छळ झाला. शिकायला जावे तो वर्गात प्रवेश नाही. प्यायला साधे पाणीदेखील मिळणे मुश्किल. मारसुद्धा खावा लागला. चालत्या गाडीतून महार म्हणून ढकलून देण्यात आले. आपण नष्ट लोक. त्यांना सर्वतोपरी छळून घेतले. पण ते समाजावर रुसले नाहीत, रागावले नाहीत. ते खरे महापुरुष.

ब्रिटिशांचे ते कट्टर विरोधक होते. अनेकदा त्यांनी ब्रिटिशांची खरड काढली. ते ब्रिटिशांना म्हणत, 'दीडशे वर्षे राज्य केल्याचा दिमाख दाखवता, पण दीडशे वर्षांपासून आम्हांला अन्न, पाणी, वस्त्र, विद्या यांच्याबाबतीत काय सुख लाभले आहे? तुमच्या राज्यात दुष्काळ पडून इतकी माणसे मेली की, सगळ्या जगात तेवढी मेली नसतील!' स्वातंत्र्य-चळवळीच्या पुढाऱ्यांनाही ते सुनावीत. त्यांना म्हणत, 'तुम्ही जर मला तुमच्याइतके राजकीय हक्क दिलेत तर मी तुमच्यात येतो.' पण पुढाऱ्यांना ते मानवले नाही. गांधीसुद्धा सत्याला जागले नाहीत. जनमताचे दडपण त्यांनी ठोकरले नाही. निर्भय नाही तो पुढारी नाही. बाबासाहेब गांधींना सांगत, "तुम्ही कॉंग्रेसच्या सभासदांना सांगितले पाहिजे की, अस्पृश्यता पाळतो तो कॉंग्रेसचा सभासद नव्हे.' हेही गांधींकडून झाले नाही. अर्थ एवढाच की, गांधी समाजसुधारक होते, समाजक्रांतिकारक नव्हते. सच्चे समाजक्रांतिकारक सांगायचे तर स्वा. सावरकर, म. फुले, रा. शाहू व डॉ. आंबेडकर ही नावे घ्यावी लागतील. या लोकांना समाजाचा पायाच बदलावयाचा होता. त्यांना वाटे लोकशाहीच्या मार्गाने समाजाचे कल्याण होईल. लोकशाही म्हणजे कायद्याचे राज्य तोही कायदा सामाजिक, नैतिक मूल्यांवर आधारलेला हवा. या मूल्यांवरच बाबासाहेबांनी घटनेची तत्त्वे निश्चित केली आहेत. अशा कायद्यासमोर प्रत्येक मनुष्य सारखाच असतो. समता लोकशाहीचा प्राण आहे. विचारांत एकता व समता आली तरच लोकशाहीस पात्र होता येते. नेत्यांची आंधळी भक्ती लोकशाहीस मारक ठरते.

त्यामुळे राष्ट्र खड्ड्यात जाते. याच दृष्टीने नेहरूंचे जेथे जेथे चुकले तेथे तेथे बाबासाहेबांनी स्पष्ट विरोध केला. उदा. राष्ट्रभाषा ही दप्तरी भाषा झाली पाहिजे असे त्यांनी सांगितले. ते नेहरूंनी मानले नाही. परिणाम आपण पाहतोच. तसेच त्यांनी पूर्वीच नेहरूंना इशारा दिला होता की, 'माओ तुम्हांला बनवतो आहे. सावध राहा. कम्युनिझम दाराजवळ आला आहे.' नेहरूंनी दुर्लक्ष केले. पुढे भारताची नामुष्की झाली. महाराष्ट्राच्या राजकारणात Realism असतो. त्याचाच वारसा बाबासाहेब चालवीत होते. इथले विद्यार्थीसुद्धा असेच सुज्ञ व डोळस व्हावयास हवेत. ही त्यांनी बाबासाहेबांच्या जीवनातून स्फूर्ती घ्यावी. जर त्यांची भक्ती तुम्ही आंधळेपणाने केलीत तर राष्ट्राचे स्वातंत्र्य कायमचे जाईल.

## आपल्याला सैनिकी महाविद्यालय काढावयाचे आहे

यशस्वी लोकशाहीचे आणखी एक पथ्य बाबासाहेबांनी सांगितले. सत्ताधारी पक्षावर अंकुश ठेवण्यासाठी सबळ विरोधी पक्ष हवा. या पक्षाने सत्ताधाऱ्यांना निर्भय विरोधी करावा. 'राज्यकर्त्यांना सतत घणाखाली धरावे.' त्याशिवाय निकोप लोकशाही रुजणार नाही. शिवाय लोकशाही निव्वळ राजकीय क्षेत्रातही असून भागणार नाही. ती सामाजिक व आर्थिक क्षेत्रांतही उतरली पाहिजे. ते म्हणत, 'जर सामाजिक क्रांती झाली नाही तर तर आर्थिक क्रांती होणार नाही. या दोहोंवाचून खरी लोकशाही नांदूच शकत नाही. स्वातंत्र्य ही लोकशाहीची पहिली गरज आहे. त्यासाठी प्राण अर्पण करण्याची तयारी ठेवली पाहिजे.' बाबासाहेब म्हणत 'रक्ताचा शेवटचा थेंब असेतो स्वातंत्र्यासाठी लढले पाहिजे.' लढ्याचा विषय निघाला की, आपल्या जातीचा बाबासाहेबांना यथार्थ अभिमान वाटे. कारण महार ही पूर्वीपासून लढाऊ बाण्याची जमात आहे. अनेकदा बाबासाहेब म्हणत की, आपल्याला मिलिटरी कॉलेज काढावयाचे आहे.

बुद्धिप्रामाण्यावर बाबासाहेबांचा विशेष भर होता. बुद्धिवादी चिकित्सेने त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. त्यांना अभिप्रेत असलेल्या समतावादी समाजक्रांतीची मूलतत्त्वे त्या धर्मात त्यांनी पाहिली. कालानुरूप त्या धर्माचा नवीन अन्वयार्थ लावला. ज्ञानेश्वरांनी जसे गीतेवर भाष्य केले तसें बाबासाहेबांनी बौद्ध धर्मावर भाष्य केले 'The Buddh and his Dhamma' या ग्रंथांतून त्यांची बौद्धधर्माकडे पाहण्याची नवीन दृष्टी आढळते. बाबासाहेबांचा 'Annihilation of Caste' व फुल्यांचा 'शेतकऱ्याचा आसूड' हे ग्रंथ विलक्षण आहेत. अवश्य वाचा. त्यामुळे बुद्धीत तेज व त्याग येईल.

बाबासाहेबांचे जीवन किती तरी अनुकरणीय आहे. विद्याभ्यासासाठी ते खडतर तपश्चर्या करीत. त्याग करीत. अमेरिकेत असताना स्कॉलरशिपमधून शिल्लक टाकीत, व पैसे घरी पाठवीत. नुसते पापड खात. जेवण घेण्याची परिस्थिती नसे. आपल्या मित्राला ते सांगत, 'मला जेवायला पैसे नाहीत व झोपायला वेळ नाही.'

इतके शिकूनही त्यांना दिमाख नव्हता. हल्ली शिकलेल्या लोकांना अडाण्यांची घृणा वाटते. आईबापांचीही ओळख ते ठेवीत नाहीत. पण विद्या येते त्याला ज्ञान येतेच असे नाही. बाबासाहेबांना खोट्या मोठेपणाचा तिटकारा होता. आपल्या वडिलांचा त्यांना फार अभिमान वाटे. वडिलांच्या मृत्यूनंतर बाबासाहेब दोन दिवस रडले. जो केवळ पदवी, पैसा व पगार मानतो त्याने बाबासाहेबांपासून काहीच स्फूर्ती घेतली नाही. त्यांच्यापासून माणूसकी शिकावी. काही व्यापाऱ्यांनी बाबासाहेबांना त्यांच्या मुलाच्या नावे कंपनी काढण्याची ऑफर दिली. पण त्यांनी ती साफ धुडकावली.

आजच्या विद्यार्थिवर्गाकडून विशेष अपेक्षा आहेत. तुम्ही नवीन भारताची मागणी करावी. असा भारत की, जो समता, ममता व संस्कृती देईल. "Privileges for higher classes and poverty for lower classes" हे आता चालणार नाही. कुणाचीही जात विचारू नका. तो माणूस काय करतो ते पाहा.

विद्यार्थ्यांना बाबासाहेब नेहमी सांगत की, 'टिळक, गोखले, रानडे यांच्यासारखा अभ्यास करा.' ते आणखीही सांगत की, जीवनात प्रयत्नांचे महत्त्व फार आहे. जो झगडतो तो वर येतो हे त्यांचे तत्त्व त्यांनी स्वतः आचरून दाखविले. तुम्हीही त्याचा स्वीकार करा.

बाबासाहेबांच्या स्मृतीचे कॉलेज म्हणून मला या कॉलेजचा अभिमान वाटतो. पण एवढ्यावर मला संतोष नाही. बाबासाहेबांच्या नावाचे विद्यापीठ काढले तर ते त्यांचे योग्य स्मारक होईल. हे विद्यापीठ समता, ममता, ज्ञान, मानव्य व संस्कृती यांचे शिक्षण देईल. प्रत्येकाने आपले तन, मन, धन या कार्यासाठी वेचावे.

---

## माझा जाहीरनामा

पृष्ठ ८ वरून

थेट सचिवालयापर्यंत कुठेही जा, तिचे दर्शन सतत घडतं अशी एकच गोष्ट म्हणजे लाचलुचपत! वशिलेबाजी!! काळाबाजार!!! चोरटी आयात!!!! सारांश नैतिक अधःपाताचं नागवं दर्शन सामान्य माणसाचं जीवन त्याला आज नकोस करून टाकीत आहे.

'गरीबी हटाव,' 'इंदिरा हटाव,' 'कम्युनिझम हटाव' अशा घोषणा घेऊन आमचे राजकीय पक्ष लोकांपुढे जात आहेत. पण 'करप्शन हटाव,' 'वशिलेबाजी हटाव,' 'काळाबाजार बंद करो,' अशा घोषणा घेऊन कोणी पुढे येत नाही. बरोबर आहे. कसे येतील? कारण या पक्षांची बुडे त्यामुळंच स्थिर आहेत. निवडणुकांना पैसा कोण पुरवतो? मग आपलं आसन हलविण्यास कोण कसा धजावेल? या पापाचं निर्मूलन झालं तर राष्ट्रीय उत्पन्न १०० टक्क्यांनी वाढेल असा काही अर्थतज्ज्ञांचा अंदाज आहे. पण मांजराच्या गळ्यांत घंटा बांधायची कोणी?

हे काम जनतेनं करायचं आहे. काळाबाजार, लाचलुचपत, वशिलेबाजी ही पापं

नष्ट करण्याचं कंकण बांधून पुढे येणाऱ्या पक्षालाच जनतेनं निवडून द्यावं. कुठल्याही राजकीय पक्षाच्या नावानं टिळा न लावणाऱ्या मतदारांनी पक्षपुढाऱ्यांना खडसून हे विचारावं आणि मगच त्याच्यापाशी समर्पक उत्तर मिळालं तर मत द्यावं. पोटभर अन्न, अंगभर वस्त्र, पिण्याला मुबलक पाणी, निवारा, औषधपाणी, मॅट्रिक-पर्यंतचे मोफत शिक्षण आणि पूर्णवेळ काम अशा किमान अपेक्षा शासनाकडून सामान्य माणसाच्या आहेत.

भारतातील प्रत्येक थरातील प्राणीमात्राच्या या किमान गरजा पूर्ण होत नाहीत तोपर्यंत मंत्र्यापासून संत्र्या (पहारेकरी) पर्यंत कुणालाही श्रीमंती चैनीचा अधिकार नाही, असा निर्वाळा देणाऱ्याच पक्षाच्या हाती सत्ता द्या. बाकीच्यांना खाली खेचा. पण आज असा एक तरी पक्ष दृष्टिपक्षात आहे का ?

माझ्या देशबांधवांना अप्रिय अशी गोष्ट इथं नमूद करतो. कारण शासनाभिलाषी पक्षपुढाऱ्यांचा लोकांच्या मतावर डोळा असल्यानं त्यांना लोकांना हे स्पष्ट सांगायला भीती वाटते.

२४ वर्षांत आम्ही लोक तरी सुधारलो आहोत का ? आमचा आळस गेला आहे का ? आमचं शिक्षण, सुसंस्कृतपणा वाढविण्याच्या दिशेने आम्ही कितीसा प्रयत्न केला आहे. सरकारच्या नावानं सतत खडे फोडणारी मंडळी आपलं स्वतःचं काम तरी चोख बजावतात का ? सरकारी कचेऱ्यांतील दफ्तरदिरंगाईमुळे आपल्या राष्ट्रीय उत्पन्नात घट येत आहे, याची किती सरकारी कर्मचाऱ्यांना खंत वाटते ? जरा तटस्थ दृष्टीनं प्रत्येकाने, स्वतःस सुशिक्षित म्हणविणाऱ्या नागरिकानं, स्वतः-कडेच पहावं. charity begins at home असं इंग्रजी सुभाषित आहे. त्याचा अवलंब आम्ही व्यक्तिशः केला तर आजचे प्रश्न राहणार नाहीत.

जपान, जर्मनी ही दुसऱ्या महायुद्धात बेचिराख झालेली राष्ट्रे अवघ्या पंचवीस वर्षांत नव्या जोमानं उठली आणि जगातील विकसित राष्ट्रांच्या मालिकेत मिरवू लागली. याचं रहस्य एकच की प्रत्येक पराभूत जपानी नागरीक खराखुरा देशभक्त होता. नुसता खादीधारी देशभक्त नव्हता.

आमच्या शाळा हे शिक्षण कधी देणार ? आजचा भारतीय नागरीक सुसंस्कृत बनविणारा जोरदार पक्ष आज देशाला हवा आहे. आमची मुलं नुसती साक्षर होतात. ती सुसंस्कृत होतील, तेव्हाच त्यांना सुशिक्षित म्हणता येईल, हे करण्याचं कंकण जो पक्ष स्वीकारील त्याला मत द्या. आमच्या तरुणांची शक्ती वाया जात आहे तिला जो मार्गी लावील त्या पक्षाला मत द्या.

देशातील २० ते ४० वर्ष वयोदरम्यानच्या प्रत्येक स्त्री-पुरुषास स्व-संरक्षणासाठी प्राथमिक सैनिकी शिक्षण आज आवश्यक असायला हवे. शाळा, कॉलेजातून सैनिकी शिक्षण सक्तीचे करायला हवे. कारण तेव्हाच शिस्त व सयम येईल. या अटी पूर्ण करण्यास जो तयार असेल त्यालाच मत द्या.

नव भारत घोषणातून होणार नाही. राजकीय पक्ष व पुढारी तो करणार नाहीत तो लोकांनी स्वतःच घडवायचा आहे. ◻ ◻ ◻

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

# अंदाज

६ ते १२ फेब्रुवारी १९७१

**मेष :** शरीरप्रकृती चांगली राहील. धनस्थानची स्थिती चांगली. अष्टमातील गुरु-मंगळ अचानक धनलाभ घडवून आणतील. हा योग सोमवार-मंगळवारी येईल. भावंडे चांगली वागतील. प्रवासयोग येईल. घरात सोमवार-मंगळवारी काही तरी शुभसमारंभ घडेल. नवीन घराची घरभरणी करण्याला दिवस चांगले आहेत. स्वभावातील ताठरपणा आवरावा.

तत्त्वज्ञानाच्या विद्यार्थ्यांना प्रगतिपर दिवस आहेत. संततीचा भाग्योदय होईल. सरकारी कामात यश येईल. फॅन्सी वस्तूंचा व्यापार करणारांना भरपूर पैसा मिळेल. मित्रांकडून नुकसानकारक घटना होण्याचा बराच संभव आहे. नवविवाहितांचा भाग्योदय होईल. २७ ते ३२ वयातील व्यक्तींना हा अनुभव येईल. चंद्राचे भ्रमण ३–४–५ स्थानांतून आहे. ते फारच चांगले आहे. शुभ तारखा ८–९–१०–११–१२.

**वृषभ :** शरीरप्रकृती नाजूक होईल. मधुमेहाचा विकार असलेल्यांना जास्त त्रास होईल. धनस्थिती चांगली राहील. सरकारी कामाकरता प्रवास होईल. हा योग सोमवार-मंगळवारी येईल. घरात मतभेद होण्याचा संभव आहे. बुधवार-गुरुवारी या बाबत काळजी घ्यावी. घर अगर राहत्या जागेसंबंधी अडचणी निर्माण होतील.

विद्याभ्यासात माघार घ्यावी लागेल. एकही गोष्ट मनासारखी होणार नाही. भागीदार व पत्नी सर्व बाजूंनी मदत करतील. प्रेमप्रकरणात सापडण्याचा योग आहे. पुरुषांकडून मागणी केली जाईल. संततीपासून त्रासदायक प्रसंग निर्माण होतील. दशमातील राहू मानमान्यतेला धक्का आणण्याचा संभव आहे. केंद्रातील गुरु सर्व संकटातून सुखरूप बाहेर आणील. चंद्राचे भ्रमण २–३–४ या स्थानातून आहे ते फारच चांगले आहे. शुभतारखा ६–७–८–९–१०.

**मिथुन :** शरीरप्रकृती चांगली राहील. सप्तमातील बुध-शुक्र कार्यक्षमता वाढवतील. धनस्थितीत निश्चित सुधारणा होईल. सहावे गुरु-मंगळ शत्रूनाश करतील व मानमान्यता मिळवून देतील. घरात काहीतरी समारंभ घडून येईल. प्रवासाचा योग येईल, तो टाळावा. सरकारी कामात अपयश येईल.

विद्याभ्यासात भरघोस यश येईल. साहित्य व कला—विशेषतः नाट्य-व्यवसायातील लोकांना सप्ताह प्रगतिपर आहे. सोमवार-मंगळवारी अचानक धनलाभ घडण्याचा जोरदार योग आहे. समाजात पत वाढेल. उद्योगधंदा चांगला चालेल. संततीची भरभराट होईल. प्रेमविवाह जमण्याचा योग शनिवार-रविवारीच जास्त

आहे. चंद्राचे भ्रमण १–२–३ या स्थानांतून आहे ते फारच चांगले आहे. शुभतारखा ६ ते १२.

**कर्क :** शरीरप्रकृती जरा नरम राहील. पडसे होईल. थंडीचा त्रास होईल. धनस्थितीला तडा जाईल. प्रवासाचा योग येईल. प्रवासात सरकारी मदत होईल. भावंडांकडून मदत होईल. मामाकडे शुभकार्याकरता जाण्याचा योग येईल. पत्नीमुळे भाग्योदय होईल. नवविवाहितांना हा अनुभव जास्त येईल.

विद्याभ्यासात मनाजोगी प्रगती होईल. पंचमातील गुरु-मंगळ म्हणजे अधिपतिकारक योग अत्यंत चांगला आहे. विशेषतः स्थापत्य, चित्रकला वगैरे कलांत नेत्रदीपक प्रगती होईल. विद्येमुळे मानमान्यता मिळेल. संततीचा उत्कर्ष होईल. २८ ते ३२ वयातील व्यक्तींचा उत्कर्ष प्रकर्षाने होईल. चंद्राचे भ्रमण १२–१–२ या स्थानांतुन आहे ते साधारण आहे. शुभतारखा ६–७–८–९.

**सिंह :** शरीरप्रकृती चांगली राहील. आध्यात्मिक विचार मनात उफाळून येतील. पराक्रम योग येईल. भावंडांची मदत होईल. सुखवृद्धी होईल. सोमवार–मंगळवारी घरात काहीतरी शुभकार्य होईल. प्रेमविवाह जमून येण्याचा योग आहे. घरासंबंधी अडचणी निवारण होतील.

विद्याभ्यासात संपूर्ण यश प्राप्त होईल. गुरु-मंगळ योग चतुर्थात आहेत. एकच एक राजयोगकारक ग्रह मंगळ केंद्रात आहे. कित्येक महत्त्वाकांक्षा पुऱ्या होतील. हातात घेतलेल्या प्रत्येक व्यवसायात प्रगती होईल. कलाकारांना परमोच्च मानमान्यता मिळण्याचा शुभयोग आहे. चंद्राचे भ्रमण ११–१२–१ आहे ते चांगले आहे. शुभतारखा ६–७–१०–११–१२.

**कन्या :** शरीरप्रकृती चांगली राहील. कन्या राशीची माणसे बहुधा नाजुकच असतात. धार्मिक वृत्ती वाढेल. धनस्थिती चांगलीच राहील. प्रवासयोग येईल. भावंडांकडून मदत होईल. घरात शनिवार-रविवारी काहीतरी कलाप्रदर्शनाचा शुभप्रसंग घडून येईल. सरकारी कामात यश येईल. स्त्रीलंपटता वाढेल.

विद्याभ्यासात अपयश होईल. सरकारी अनुदान मिळणाऱ्या व्यक्तींना अडचणी निर्माण होतील. चित्रकला, साहित्य–प्रकाशक वगैरे व्यवसायिकांना प्रगतिपर सप्ताह आहे. भागीदार चांगले वागतील. सोमवार-मंगळवारी मित्रांकडून सर्व तऱ्हेची मदत मिळेल. धार्मिकता वाढेल. चंद्राचे भ्रमण १०–११–१२ या स्थानांतून आहे ते चांगले आहे. शुभतारखा ८–९–१०.

**तूळ :** शरीरप्रकृती चांगली राहील. धनस्थिती फारच चांगली राहील. भागीदारांकडे गुंतून पडलेली रक्कम सोमवार-मंगळवारी हातात पडेल. प्रवासयोग टाळावा. भावंडे नीट वागणार नाहीत. घराबद्दल अडचणी निर्माण होतील. फौजदारी खटले निर्माण होण्याची शक्यता आहे. सोमवार-मंगळवारी पाहुणे येऊन दिवस आनंदात जातील.

विद्याभ्यासात माघार घ्यावी लागेल. परीक्षा नापास होण्याचा योग आहे. गुरुवार-शुक्रवार या दृष्टींनी वाईट जातील. संततीचा उत्कर्ष होईल. पोलीस, रेव्हेन्यू, मॅजिस्ट्रेट वगैरे ऑफिसर्सना कामाचा ताण पडेल. न आवडणाऱ्या जागी बदली होईल. एजंटस् व वाहतुकीचे व्यवसाय करणाऱ्यांना खूप काम व पैसा मिळेल. चंद्राचे भ्रमण ९–१०–११ या स्थानांतून आहे ते चांगलेच आहे. सर्व सप्ताह शुभफलदायी आहे.

वृश्चिक : शरीरप्रकृती चांगलीच सुधारेल. लग्नातील गुरु-मंगळ युती धनसंपत्ती वाढवील. येणारे पैसे आपोआप सोमवार-मंगळवारी हातात पडतील. प्रवासयोग येईल. सरकारी कामात यशप्राप्ती होईल. सासुरवाडची मंडळी येऊन दिवस आनंदात जातील. भावंडांकडून सर्व बाबतींत मदत होईल. मित्रांकडून फसवणूक घडण्याचा संभव आहे.

विद्याभ्यासात संपूर्ण यश येईल. संततीच्या भरभराटीचा काळ येईल. मिलिटरीतील नोकरांना मनासारख्या जागी प्रमोशनवर बदली होईल. २८ ते ३२ वयातील व्यक्तींना याचा अनुभव येईल. इंडिकेटची राशी आहे. प्रचारकार्यात भरघोस यश येईल. उद्योगधंदा चांगला प्रगतिपथावर जाईल. शत्रूनाश होईल. मित्रांची बहुमोलाची मदत होईल.

चंद्राचे भ्रमण ८।९।१० या स्थानातून आहे. ते साधारण आहे. शुभतारखा ६ ते १०.

धन : शरीरप्रकृती जरा नरम राहील. धनस्थितीत अडचणी निर्माण होईल. धनस्थानातील रवी-वुध सप्तमेश भाग्येश दशमेश धनात आहे. सरकारी अगर सहकारी संस्थाकडून धनलाभ होईल. व्ययातील गुरू चतुर्थावर पाहतो तो सुखवृद्धी करील. सोमवार-मंगळवारी अनपेक्षित शुभघटना घडतील. प्रवास टाळावा. भावंडांशी मतभेद होतील. मित्रांकडून बहुमोलाची मदत होईल. शत्रूसुद्धा आपणहून मदत करतील.

विद्याभ्यासात अडचणी निर्माण होतील. कारकाधिपती योग व्ययात आहे. त्याला स्थानबल नाही. मातुल घराण्यातील माणसे भेटतील. शनिवार-रविवारी विवाहाची बोलणी होण्याचा योग येईल. हा अनुभव ३२ ते ३६ वयातील व्यक्तींना जास्त येईल. कलाकारांना दिवस फारच यशदायी आहेत. कीर्ती व त्याबरोबर कौतुक व पैसाही मिळेल.

चंद्राचे भ्रमण ७।८।९ या स्थानांतून आहे. ते चांगले आहे. सर्व सप्ताह शुभफलदायी आहे.

मकर : शरीरप्रकृती चांगली राहील. पैशाची ओढाताण होईल. सोमवारी अचानक धनलाभाचा योग आहे. वागणुकीत कठोर भाषेचा उपयोग केला जाईल. तो आवरावा: घरात मतभेद होतील. भावंडांची व मित्रांची संपूर्ण मदत होईल. शनी-

रविवर पाहतो त्यामुळे अनेक भांडणे उपस्थित होतील. त्यातून गुरु-मंगळ शिर-सलामत बाहेर आणतील.

विद्याभ्यासात अपयश येईल. संतती नीट वागणार नाही. मानमान्यतेला कमी-पणा येईल. स्त्रीलंपटपणा उत्पन्न होईल. सोमवार-मंगळवारी विवाहाची बोलणी करण्याला चांगले आहेत. कलाकारांना अडचणी उत्पन्न होतील. विशेषतः पुरुष नटांना नाटकातील भूमिकेत अपयश येईल. फॅन्सी वस्तूंच्या व्यापाऱ्यांना जरा धोका-दायक काळ आहे. व्यापार जपून करावा.

चंद्राचे भ्रमण ६।७।८ या स्थानांतून आहे. ते मध्यम आहे. शुभतारखा ८।९। १०।११.

**कुंभ :** शरीरप्रकृती चांगली राहील. स्वभावात चिडखोरपणा येईल. मन आवरावे. ४२ च्या पुढील व्यक्तींना कमी त्रास होईल. धनस्थिती फारच चांगली राहील. सोमवार-मंगळवारी धनलाभ घडेल. वडिलार्जित जमीनजुमल्याचे पैसे हातात पड-तील. गुरुवार-शुक्रवारी घरात विवाहासंबंधी बोलणी होतील. प्रवासयोग येईल. प्रवासात उन्नतिकारक घटना घडतील.

विद्याभ्यासात अपयश येईल. पंचमेश-अष्टमेश बुध व्ययात रवीबरोबर आहे. त्याचा कारक. गुरुशी ३।११ योग आहे. त्यामुळे अपयशाची तीव्रता कमी होईल. फॅन्सी वस्तूंचे व्यापारी, कलावंत, गायक, चित्रकार यांना दिवस फारच चांगले आहेत. ९।१०।११ स्थानांच्या अधिपतींना अन्योन्य योगामुळे अचानक मानमान्यता मिळेल व धंदा कल्पनातीत वाढेल.

चंद्राचे भ्रमण ५।६।७ या स्थानांतून आहे. ते चांगले आहे. सर्व सप्ताह शुभफल-दायक आहे.

**मीन :** शरीरप्रकृती चांगली राहील. भाग्यात गुरु-मंगळ आहेत. ते प्रत्येक बाब-तीत भाग्य वाढवतील. धनस्थिती चांगली राहील. प्रवासयोग येईल. त्यात अत्यंत फायदा होईल. घरात सोमवार-मंगळवारी शुभसमारंभ साजरा होईल. पाठच्या भावंडांकडून सर्व बाजूंनी मदत होईल.


विद्याभ्यासात नेत्रदीपक प्रगती होईल. सरकारी अनुदान मिळेल. परदेशगम-नाचा योग येईल. आध्यात्मिक विचार प्रबळ होतील. नाट्य कलाकारांना मोठे मोठे सन्मानाचे योग येतील. परोपकाराची कामे हातून घडण्याचा सुयोग आहे. व्यापार-धंदा तेजीत राहील.

चंद्राचे भ्रमण ४।५।६ या स्थानांतून आहे, ते चांगले आहे. शुभतारखा ६ ते १०.

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Biweekly) : 40 Paise : Regd. No. M-H 649



" गेल्या निवडणुकीत याच मतदारसंघातून तुम्ही निवडून गेला होता. असं असूनदेखील पुन्हा तुम्हाला यशाची आशा वाटते म्हणता ? ..."